# ज्ञानज्योत

## वंचितांच्या शिक्षणाची




**महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद**

जवाहर बाल भवन, नेताजी सुभाष मार्ग,

चर्नीरोड, मुंबई- ४०० ००४

# अनुक्रमणिका...


| | | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|
| १. | पार्श्वभूमी | १ |
| २. | काय आहे महात्मा फुले शिक्षण हमी योजना | ३ - ५ |
| ३. | स्थलांतरीतांसाठीची योजना | ५ - ७ |
| ४. | यशकथा - स्वप्न यशाचे<br>नवी आशा<br>विद्यार्थी संख्या | ८ - ११ |
| ५. | वस्तीशाळा आहे तरी काय ? | १२ - १६ |
| ६. | यशकथा - आणि शीतल वस्तीशाळेत आली<br>समाजशाळा वस्तीशाळा<br>मंदीर बनलं वस्तीशाळेत<br>आणि मुलांची पायपीट थांबली | १७ - २० |
| ७. | वस्तीशाळा व महात्मा फुले शिक्षण हमी योजना एका दृष्टीक्षेपात | २१ - २५ |
| ८. | इतर राज्यातील पर्यायी शिक्षण विषयक उपक्रम | २६ - ३५ |
| ९. | महाराष्ट्रातील पर्यायी शिक्षणातील उपक्रम | ३६ - ४१ |
| १०. | महात्मा फुले शिक्षण हमी योजना शासन निर्णय | ४२ - ५१ |
| ११. | महात्मा फुले शिक्षण हमी योजनेंतर्गत स्थलांतरित मुलांसाठी प्राथमिक शिक्षणाची सोय शासन निर्णय | ५२ - ५५ |
| १२. | महात्मा फुले शिक्षण हमी योजनेंतील शासननिर्णयातील सुधारणा | ५६ - ५८ |
| १३. | वस्तीशाळाबाबतचा शासन निर्णय दि.१८ एप्रिल २००० | ५९ - ६७ |
| १६. | वस्तीशाळाबाबतचा शासन निर्णय दि.२० मार्च २००१ | ६८ - ७९ |
| १७. | पर्यायी शिक्षणाबाबत संदर्भ पुस्तकाची सूची | ८० |

## पार्श्वभूमी....

अनौपचारिक शिक्षण व्यवस्थेबरोबरच पर्यायी शिक्षणाची व्यवस्था निर्माण केल्याशिवाय प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होणे शक्य नाही, असे प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ जे. पी. नाईक यांचे मत होतं. वीस वर्षांपूर्वी त्यांनी अनौपचारिक शिक्षणास नवी दिशा निर्माण करून दिली. १९७९ मध्ये अनौपचारिक शिक्षणाच्या संकल्पनेला मूर्त स्वरूप आणण्यासाठी प्रोपेल (प्रमोटिंग प्रायमरी अ‍ॅण्ड एलिमेंटरी एज्युकेशन) प्रकल्प या नावाने त्यांनी कृती संशोधन हाती घेतलं आणि त्यानुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ च्या सुधारित कृती कार्यक्रम १९९२ च्या मसुद्यामध्ये प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात आला. वंचित मुलांना या पर्यायी शिक्षण व्यवस्थेमुळे ज्ञानाची दारं खुली झाली.

परंतु मूळ प्रश्न आहे तो म्हणजे औपचारिक शाळेत मुलं का येऊ शकत नाहीत ? याची कारणमीमांसा आतापर्यंत बऱ्याच शिक्षण तज्ज्ञांनी केली आहे. त्यानुसार मुलं शाळेबाहेर राहण्याची काही मुख्य कारणं पुढीलप्रमाणे आहेत :-

- दारिद्र्य - रोजी-रोटीचा प्रश्न महत्त्वाचा वाटत असल्यामुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष.
- प्रभावहीन शालेय वातावरण.
- भौतिक सुविधांचा अभाव.
- सामाजिक रूढी - परंपरा.
- पालकांचे अज्ञान.
- शालेय व्यवस्थापनात नियोजनाचा अभाव.
- समाज घटकांचा अत्यल्प सहभाग.
- ग्रामशिक्षण समित्यांची निष्क्रीयता.
- शिक्षकांची सदोष अध्यापन पद्धती.

अशा वेगवेगळ्या कारणांमुळे महाराष्ट्रात अनेक मुलं शिक्षणापासून वंचित आहेत. अशा शाळाबाह्य मुलांचा शोध घेता यावा यासाठी सर्व शिक्षण मोहिमेच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात शाळाबाह्य मुलं, शाळेत कधीच दाखल न झालेली मुलं, शाळेतून गळती झालेली मुलं याचा शोध कुटुंब सर्वेक्षणातून करण्यात येत आहे. या सर्वेक्षणानुसार प्रत्येक वस्तीवर, प्रत्येक गावात किती मुलं शाळेबाहेर आहेत आणि शाळेबाहेर असण्याची कारणे काय आहेत याची माहिती मिळणार आहे. परंतु राज्यातील ग्रामीण व आदिवासी भागातील बहुसंख्य मुलं दारिद्र्यामुळे आपल्या कुटुंबाला आधार म्हणून शाळेबाहेर राहतात. बऱ्याचशा मुली घरकामात गुंतविलेल्या असतात. औपचारिक शिक्षणातील नियमावली, साचेबद्धपणा व संरचना यांमुळे अनेक मुलामुलींना औपचारिक शिक्षण पूर्ण करता येत नाही.

अशी अनेक मुलीमुले कायमस्वरूपी शाळेबाहेर आहेत. ही मुले पारंपरिक कौशल्य, शहाणपण नैसर्गिकरीत्या प्राप्त करतात. परंतु औद्यागिकीकरण, आधुनिकीकरण यामुळे होणाऱ्या बदलांना ते समर्थपणे सामोरे जाऊ शकत नाहीत. या मुलांचं जीवन अधिक सुकर व्हावं यासाठी त्यांना कोणत्या न कोणत्या शैक्षणिक

व्यवस्थेत सामावून घेणे आवश्यक आहे. यासाठी पर्यायी शिक्षणाची विविध दालनं निर्माण करणे हे अत्यंत महत्त्वाचे काम आहे. जिल्हा प्राथमिक शिक्षण प्रकल्पांतर्गत काही जिल्ह्यांमध्ये पर्यायी शिक्षणाचे वेगवेगळे प्रयोग हाती घेण्यात आले आहेत. वस्त्यांमध्ये विखुरलेल्या संख्येने असणाऱ्या मुलांसाठी समूह निवासी शाळा, सेतू वर्ग, वीटभट्टी शाळा, साखर शाळा असे अनेक कार्यक्रम हाती घेण्यात आले. अशा प्रकारच्या कार्यक्रमांची व्याप्ती संपूर्ण राज्यभर व्हावी व या प्रत्येक उपक्रमामध्ये समाजाचा सहभाग असावा यासाठी स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन काम करावे लागेल. मात्र यासाठी पर्यायी शिक्षणाची व्यवस्था समजून घेणे आवश्यक आहे. यासाठी सर्व शिक्षण मोहीम हा नवा कार्यक्रम एक संधीच आहे.

**पर्यायी शाळा :**

औपचारिक शिक्षणाची सोय उपलब्ध नसलेल्या किंवा औपचारिक शिक्षणाचा लाभ काही अपरिहार्य कारणामुळे घेऊ शकत नसलेल्या मुलामुलींसाठी शिक्षणाची पर्यायी व्यवस्था निर्माण करणे ही पर्यायी शिक्षणाची मूळ संकल्पना आहे.

**पर्यायी शिक्षणाची उद्दिष्टे :**

- भारतीय राज्यघटनेच्या ४५ व्या कलमान्वये १४ वर्षे वयापर्यंत मुला-मुलींना शिक्षण प्रवाहात टिकवून ठेवणे.
- विविध कारणांमुळे शाळेबाहेर राहिलेल्या मुलां-मुलींना शिक्षण प्रवाहात सामावून घेणे.
- अशा मुलांसाठी गरजेनुसार शिक्षणाचे योग्य पर्याय विकसित करणे.
- दर्जेदार प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी औपचारिक व्यवस्थेशी समकक्ष व्यवस्था निर्माण करणे.
- मुलांना अनौपचारिक शिक्षणाकडून औपचारिक शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे.
- औपचारिक शिक्षणात लवचीकपणा आणून ते प्रभावी करणे.
- औपचारिक शिक्षणाचे फायदे शाळाबाह्य असणाऱ्या घटकांपर्यंत पोहोचविणे.

महाराष्ट्रात या अनुषंगाने महात्मा फुले शिक्षण हमी योजना सुरू करण्यात आली. त्याचबरोबर वस्ती पातळीवर शिक्षणाची सुविधा असावी यासाठी वस्तीशाळा सुरू करण्यात आल्या आहेत. या योजनांमुळे १,४७,९६८ मुलामुलींच्या आयुष्यात शिक्षणाची संधी निर्माण होऊ शकली.

या योजना काय आहेत हे समजून घेण्याची आवश्यकता आहे.

# *काय आहे महात्मा फुले शिक्षण हमी योजना ?....*



६ ते १४ वयोगटातील मुलास किमान ४थी पर्यंतचा अभ्यासक्रम पूर्ण करता यावा आणि ते मूल शिक्षणाच्या मूळ प्रवाहात यावं यासाठी विद्यार्थ्यांच्या सोयीने शिकण्यासाठीचा वर्ग म्हणजे महात्मा फुले शिक्षण हमी योजना. हा वर्ग चालविण्यासाठी स्थानिक पातळीवरील कार्यकर्ता असल्यास तोच हे केंद्र अधिकाधिक समाजाभिमुख करेल या धारणेने केंद्र निदेशकांची नेमणूक स्थानिक पातळीवर करण्यास प्राधान्य दिले आहे. अधिकाराच्या विकेंद्रीकरणातून विकासाची नवी दिशा ठरवता यावी यासाठी या केंद्र निदेशकांच्या नियुक्तीचे अधिकार स्वयंसेवी संस्थेकडे देण्यात आले आहेत. या योजनेचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे :-

**शासन निर्णय क्रमांक पीआरई २०००/(२६०१)/प्राशि-१,**
**दि. १३ ऑक्टोबर, २०००**

- **योजनेचे उद्दिष्ट** — सर्वेक्षणानुसार ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य मुलांच्या इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या समकक्ष शिक्षणाची सोय उपलब्ध करून देऊन अशा मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात येण्याची संधी उपलब्ध करून देणे.
- **लाभार्थी** — ६-१४ वयोगटातील बालक्रामगारांसह सर्व शाळाबाह्य मुले
- **योजनेची अंमलबजावणी कोण करू शकेल.** — पंजीकृत स्वयंसेवी संस्था
  पंजीकृत शिक्षण संस्था
  स्थानिक स्वराज्य संस्था
  स्वयंसेवी संस्थांना प्राधान्य देण्यात येईल
- **योजनेचे स्वरूप** — ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य मुलांसाठी स्वयंसेवी संस्थेकडून / स्थानिक स्वराज्य संस्थेकडून केंद्र सुरू केले जाईल.

  केंद्रासाठी जागा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने / स्वयंसेवी संस्थेने मोफत उपलब्ध करून द्यावयाची आहे.

  प्रत्येक केंद्रामध्ये किमान १५ विद्यार्थी व कमाल २० विद्यार्थी असणे आवश्यक आहे.

  प्रत्येक केंद्र दिवसा किमान चार तास चालविले जाईल.

  एका केंद्राच्या अध्यापनासाठी एक स्वयंसेवक मानधनावर नियुक्त केला जाईल.

  या केंद्रामध्ये दाखल झालेल्या मुलांमध्ये दोन वर्षांच्या कालावधीत इयत्ता ४थी पर्यंतची अध्ययन क्षमता विकसित करणे अपेक्षित आहे.

  सदर केंद्र शैक्षणिक वर्षात केव्हाही सुरू करता येईल व तेव्हापासून ते सलग दोन वर्ष चालविणे अपेक्षित आहे.

| | |
|---|---|
| • **अभ्यासक्रम/ पाठ्यपुस्तके** | महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे योजनेचा अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके इतर साहित्य तयार करण्यात येत आहेत. तोपर्यंत भारतीय शिक्षण संस्थेचा अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकांचा वापर या केंद्रामधून सुरु आहे. |
| • **केंद्राचा कालावधी** | दोन वर्षे, दररोज ४ तास (घड्याळी) |
| • **केंद्र स्वयंसेवक / केंद्र चालक** | वय : किमान १८ वर्षे<br>अर्हता : १२ वी उत्तीर्ण<br>महिला व डी.एड. उत्तीर्ण यांना प्राधान्य.<br>नेमणूक स्थानिक उमेदवाराचीच करावी. स्थानिक उमेदवार १२वी उत्तीर्ण उपलब्ध न झाल्यास किमान १०वी उत्तीर्ण स्थानिक उमेदवार नेमता येईल. सेवानिवृत्त शिक्षक / राष्ट्रीय सेवायोजन/एन.सी.सी./ नेहरू युवक केंद्र कार्यकर्ते यांचाही नेमणुकीसाठी विचार करावा. |
| • **स्वयंसेवक नेमणुकीचे अधिकार** | स्वयंसेवकाची नियुक्ती केंद्र चालविणारी संबंधित स्वयंसेवी संस्था करारपद्धतीवर करील. कराराचा नमुना प्राथमिक शिक्षण संचालक यांनी विहित करावा.<br>स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत स्वयंसेवकाची नियुक्ती संबंधित ग्रामपंचायत / ग्रामशिक्षण समिती/ नगरपालिका / महानगरपालिका - शिक्षण समिती करील. |
| • **प्रशिक्षण** | एकूण ३० दिवसांची सेवापूर्व प्रशिक्षण व महिन्यातून दोन दिवसांचे उद्‌बोधन.<br>महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद प्रशिक्षण अभ्यासक्रम विकसित करील व प्रशिक्षणाचे आयोजन करण्याची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांवर राहील. |
| • **आर्थिक निकष** | २० मुलांपर्यंत संख्या असलेल्या केंद्रास खालीलप्रमाणे खर्च अनुज्ञेय राहील : |

- स्वयंसेवकाचे/ केंद्र चालकाचे मानधन रु. १२,०००/- (रु. १००० दरमहाप्रमाणे)

| | |
|---|---|
| • पाठ्यपुस्तके | रु. २,५००/- |
| • प्रशिक्षण | रु. १,२२५/- |
| • सादिलवार खर्च | रु. २,०००/- |
| • पर्यवेक्षण | रु. ९००/- |
| **एकूण** | **रु. १८,६२५/-** |

विद्यार्थी संख्या २० पेक्षा कमी असेल तर, ७ मुली किंवा १० मुले-मुलींपर्यंत स्वयंसेवकास किमान रु. ५००/- दरमहा मानधन मिळेल. ७ पेक्षा अधिक मुली किंवा १० पेक्षा अधिक मुले-मुली असतील तर प्रत्येक जादा विद्यार्थ्यामागे रु. ५०/- दरमहा याप्रमाणे मानधनात वाढ होईल. तथापि, कमाल मानधन रु. १,०००/- पर्यंत राहील. यापेक्षाही जेथे कमी विद्यार्थी उपलब्ध असतील तेथे प्रत्येक विद्यार्थ्यामागे रु. ५०/- दरमहा या दराने मानधन देऊन वर्ग चालविता येतील.

**हंगामी स्थलांतरित मुलांसाठी प्राथमिक शिक्षणाची सोय उपलबध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २३ एप्रिल २००२ रोजी पर्यायी शिक्षणासाठी एक नवं दालन निर्माण केलेले आहे. ऊसतोड कामगारांची मुले व अन्य कारणांमुळे स्थलांतरित होणाऱ्या मुलांसाठी , त्यांचे जेथे स्थलांतर झाले आहे तेथेच शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी अशा प्रकारची व्यवस्था महाराष्ट्र शासनाने निर्माण करून दिली आहे. (शासन निर्णय क्र. पीआरई-२००१/(२९०२)/प्राशि-१ दिनांक २३ एप्रिल ,२००२)**

- **योजनेचे उद्दिष्ट** — हंगामी किंवा मोसमी स्थलांतरित होणाऱ्या कामगारांच्या ६ ते १४ वयोगटातील मुलांसाठी प्राथमिक शिक्षणाची सुविधा त्यांच्या पालकांच्या कामाच्या ठिकाणी उपलब्ध करून देणे.
- **लाभार्थी** — हंगामी स्थलांतरित होणाऱ्या कामगारांची ६ ते १४ वयोगटातील मुले.
- **योजनेची अंमलबजावणी कोण करू शकेल :** — योजनेची अंमलबजावणी संपूर्णपणे स्वयंसेवी संस्थेमार्फत केली जाईल.
- **योजनेचे स्वरूप :** — (१) स्थलांतरित कामगारांच्या कामाच्या ठिकाणी किमान सहा महिन्यांसाठी अनौपचारिकरीत्या शिक्षण देणारे केंद्र सुरु केले जाईल.

  (२) प्रत्येक केंद्रात ६ ते १४ वयोगटातील किमान १५ मुले उपलब्ध असतील.

  (३) प्रत्येक केंद्रामध्ये गरजेनुसार इयत्ता १ली ते ७वी पर्यंतच्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल.

  (४) केंद्र चालविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

- **केंद्राचा कालावधी** — केंद्र किमान ६ महिने कालावधीसाठी चालेल. दररोज केंद्र किमान ४ तास सुरू राहील. अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या ठिकाणचे काम ४ महिनेपर्यंत कमी राहणार असेल तर, अशा ठिकाणी दिवसातून ६ तास शिक्षण दिले जाईल, जेणेकरून संबंधित वर्गाचा विहित अभ्यासक्रम पूर्ण केला जाईल.

  केंद्र संबंधित शैक्षणिक वर्षात केव्हाही सुरू करता येईल.

- **अभ्यासक्रम** — केंद्रामधून भारतीय शिक्षण संस्थेचा अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके वापरण्यात यावीत. तसेच एखाद्या स्वयंसेवी संस्थेने स्वतःचा अभ्यासक्रम विकसित केल्यास त्यास महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची मान्यता देऊनच तो अमलात आणण्यात यावा.

- **केंद्र स्वयंसेवक:** — अध्यापन पदविका उत्तीर्ण उमेदवार प्राप्त झाल्यास, अशा उमेदवारास केंद्र स्वयंसेवक म्हणून प्राधान्याने नियुक्ती द्यावी तथापि असा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर, किमान १२वी उत्तीर्ण उमेदवार नियुक्त करणे आवश्यक राहील. केंद्र स्वयंसेवकाची निवड व नियुक्ती संबंधित स्वयंसेवी संस्था करील. तसेच त्यांना मानधन देण्याची जबाबदारी त्या संस्थेची राहील.

- **केंद्राचे ठिकाण** — स्थलांतरित कामगारांच्या साहाय्याने सुरू असलेल्या कामाचे ठिकाण.

- **केंद्र सुरू करावयाची कार्यपद्धती :**

  (१) ज्या ठिकाणी स्थलांतरित कामगार काम करीत आहेत व त्या ठिकाणी जे कामगार ६ महिन्यांपर्यंत राहणार आहेत, अशा ठिकाणी त्या स्थलांतरित कामगारांची त्यांच्याबरोबर असलेली ६ ते १४ वयोगटातील किमान १५ मुले प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी उपलब्ध होऊ शकतील, अशा ठिकाणी केंद्र सुरू करण्यासाठी पंजीकृत स्वयंसेवी संस्था अर्ज करू शकतील.

  (२) केंद्र सुरू करावयाची मागणी ग्रामीण भागात शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद व शहरी भागात प्रशासन अधिकारी, नगरपालिका किंवा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका यांचेकडे विहित नमुन्यात करण्यात यावी. अर्जाचा नमुना शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी विहित केल्याप्रमाणे राहील.

  (३) निकषानुसार पात्र संस्थांचे अर्ज महात्मा फुले शिक्षण हमी योजनेसाठी जिल्हा स्तरावर व महानगरपालिका/नगरपालिका स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या कार्यकारी समितीच्या मान्यतेनंतर महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकरिता मंजुरीसाठी पाठविण्यात येतात.

(४) महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच संबंधित स्वयंसेवी संस्थेने केंद्र सुरू करावयाचे आहे.

- **केंद्रांचे व्यवस्थापन व प्रशासनः** केंद्राच्या व्यवस्थापनाची व प्रशासनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित स्वयंसेवी संस्थेची राहील. जिल्हा परिषदांचे शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, शासन किंवा शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे अन्यथा निर्दिष्ट करतील, असे अधिकारी/कर्मचारी सदर केंद्राची तपासणी करतील असे अधिकारी केलेल्या तपासणीच्या अनुषंगाने सदर केंद्र सुरू ठेवावयाचे किंवा नाही याची शिफारस करतील व या शिफारशीच्या अनुषंगाने संबंधित कार्यकारी समिती केंद्र पुढे सुरू ठेवावयाचे किंवा नाही याचा निर्णय घेईल.

- **केंद्रातील विद्यार्थी :** संबंधित केंद्रामध्ये स्थलांतरित कामगारांच्या मुलांना विद्यार्थी म्हणून प्रवेश केल्यानंतर पूर्वीच्या शाळेचा दाखला विचारात घेऊन त्यापुढील वर्गासाठी अभ्यासक्रम पूर्ण करून घेण्यात यावा. तसेच ज्या वर्गामध्ये ते शिक्षण घेत आहेत, तसा दाखला असेल त्या वर्गामध्ये प्रवेश देण्यात यावा.

  संबंधित विद्यार्थ्याकडे पूर्वीच्या शाळेचा दाखला नसेल, तर त्या विद्यार्थ्याचे वय व संपादणूक (अभ्यास) विचारात घेऊन त्याला संबंधित वर्गात प्रवेश देण्यात यावा. (वयाच्या बाबतीत तो पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर इयत्ता १ली मध्ये शिक्षण घेत असता असे गृहीत धरण्यात यावे म्हणजेच सहा वर्ष वयाच्या मुलाला त्याची १ली ची संपादणूक पूर्ण असेल तर इ. २ री मध्ये प्रवेश देता येईल)

- **नियमित शाळेत प्रवेश :** अशा केंद्रामधून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना केंद्राच्या स्वयंसेवकाने दिलेल्या दाखल्याच्या आधारे नियमित शाळेत प्रवेश देण्यात यावा.

- **अनुदान :** एका केंद्रासाठी वार्षिक रु. ११,८००/- एवढे अनुदान शासनाकडून/ केंद्र शासनाकडून देय असेल तर अनुदानाचा तपशील पुढीलप्रमाणे:-

  (१) स्वयंसेवकाचे मानधन : रु. ९०००/-
  दरमहा रु. १५००/- प्रमाणे सहा महिन्यांसाठी


  (२) पाठ्यपुस्तके : रु. ८००/-
  (प्रति विद्यार्थी रु. ४०/- याप्रमाणे
  २० विद्यार्थ्यांसाठी)

  (३) सादील खर्च : रु. १०००/

  (४) प्रशिक्षण:(आयोजित केल्यास) रु. १०००/-

  या योजनेचा समावेश केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त होण्यासाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाच्या जिल्हानिहाय कृती आराखड्यामध्ये करण्यात यावा.

## स्वप्न यशाचं !



झेबू ( झेबून्निसा ) ! अर्धापुरातील जिल्हा नांदेड मागासवस्तीतील मुलगी. दुसरीपर्यंत शिकून घरी बसलेली. वडिलांचा व्यवसाय मजुरीचा. कुणाची लाकडं फोडावीत. कधी कुठं कोणी सांगेल ते काम करावं..! काम केलं तरच घरात चूल पेटणार. झेबूला पाच भावंडं. त्यात झेबूकडे कोण लक्ष देणार? शाळेला लांबवर कोण पाठविणार?

गावात महात्मा फुले शिक्षण हमी योजनेच्या वर्गाची सुरुवात झाली. आपल्याच वस्तीत घराशेजारी काजी गल्लीत उघडलेल्या महात्मा फुले शिक्षण हमी योजनेच्या केंद्रात झेबू येऊ लागली, शिकू लागली. मोत्यासारखं टपोरं अक्षर ती काढते. फाड्-फाड् वाचते.

हे पाहून तिचे वडील मात्र प्रभावित झाले म्हणाले, " माझ्या झेबूची शाळा आता नाही बंद करणार ! तिला खूप-खूप शिकवणार !"

झेबू म्हणते---, " मला विमानाचा ड्रायव्हर व्हायचंय ". किती ते उत्तुंग स्वप्न ! महात्मा फुले शिक्षण हमी योजनेनं दिलेलं हे यशाचं स्वप्न! आता ती घरी जाते तेव्हा आपल्या भावंडांना गोळा करते. पुस्तकातले धडे ऐकवते. त्यांच्या घरात आता शिक्षणाचे वातावरण तयार झाले आहे. झेबूच्या आयुष्याला आता वळण लागणार. ती खूप-खूप शिकणार नाही का ?

**पर्यायी शिक्षण -महात्मा फुले शिक्षण हमी योजना : जिल्हा नांदेड**

| अ.क्र. | क्षेत्र | कार्यरत केंद्र | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | जि.प. | १११ | २०५३ | १४१२ | ३४६५ |
| २. | म.न.पा. | ३७ | ५६२ | २४९ | ८११ |

## नवी आशा !

**पा**थरी येथील अजीज मोहल्ल्यात तीन मुलांची भर पडली. त्या दोन बहिणी व एक भाऊ. तिघेही आपल्या आजीकडे राहायला आलेली. मोहल्ल्यातील सर्वच अनोळखी. आईच्या संसारावर वडिलांनी दारूपायी कुऱ्हाड घातली. अर्धा संसार मोडीत काढला. शेवटी माहेराने आधार दिला. आलिया, सुमय्या, रूबय्या या तीन पाल्यांसह जुलेखा बेगम माहेरी राहायला आलेली. तिघांच्या चेहऱ्यावर नेहमीच प्रश्नचिन्ह, उदासीनतेने त्यांना सतत ग्रासलेले.

मोहल्ल्यातील मुले शाळेत जाताना पाहून त्यांना वाईट वाटायचे. टी. सी. नसल्यामुळे त्यांना कोणत्याही शाळेत प्रवेश मिळत नव्हता. जवळ पैसे नसल्याने टी. सी. मागविता येत नाही. नवीन वह्या-पुस्तके घेऊन वर्गात प्रवेश घेणे तर दूरच.

शहाँजहाँ मोगल त्याच मोहल्ल्यातील महात्मा फुले शिक्षण हमी योजनेचा वर्ग चालविणारी केंद्र स्वयंसेविका तिच्या हे लक्षात आले. ती जुलेखा बेगमला भेटली. मुलांना शाळेत प्रवेश देण्याविषयी सल्ला दिला. जुलेखाँने आपली परिस्थिती तिच्या समोर मांडली. शहाँजहाँने तिला महात्मा फुले शिक्षण हमी योजनेची माहिती दिली. मुलांना वर्गात प्रवेश देण्याविषयी विनंती केली. विनापैशाने आपल्या मुलांना शिक्षण मिळणार हे पाहून तिला खूप खूप आनंद झाला.

मुलांचा आनंद तर गगनात मावत नव्हता. रोज शहाँजहाँकडे ही मुले नित्यनेमाने शिक्षण घेत आहेत. शिक्षणामुळे आता तिच्या मुलांच्या जीवनात तरी परिवर्तन होईल यावर जुलेखाँचा आता पक्का विश्वास आहे.

### जिल्हा -परभणी यशोगाथा

| अ. क्र. | तालुका | वस्ती शाळा संख्या | विद्यार्थी संख्या | | | म.फु.शि.ह. योजना केंद्र संख्या | विद्यार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण | | मुले | मुली | एकूण |
| १. | परभणी | ३ | ४२ | ३७ | ७९ | १९१ | २७८९ | २२८२ | ४९७१ |
| २. | पाथरी | १० | १८९ | १७७ | ३६६ | ५९ | ९४१ | १०२६ | १९६७ |
| ३. | गंगाखेड | २५ | २५९ | २६९ | ५२८ | ९० | १२५४ | १२२० | २४७४ |
| ४. | जिंतूर | १२ | १५० | ११६ | २६६ | ४० | ६६८ | ८२२ | १४९० |
| एकूण | | ५० | ६४० | ५९९ | १२३९ | ३८० | ५६५२ | ५३५० | १०९०२ |

अशा अनेकांच्या आयुष्यात शिक्षणाची ही ज्ञानगंगा महात्मा फुले शिक्षण हमी योजनेमुळे पोहचली. आज महाराष्ट्रात ६८,४८८ विद्यार्थी या केंद्रांमधून शिक्षण घेत आहेत.

या योजनेची व्याप्ती आणि या माध्यमातून किती विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळाला याबाबतची माहिति जिल्हानिहाय पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | मंजूर केंद्रांची संख्या | प्रत्यक्ष सुरू केंद्रांची संख्या | विद्यार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मुले | मुली | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १. | औरंगाबाद | १९७ | १८६ | २२१५ | २११३ | ६७१२ |
| २. | परभणी | ३८० | ३५८ | ४३७७ | ४०७४ | ८४५१ |
| ३. | हिंगोली | १९५ | ९५ | १२९० | १११२ | २४०२ |
| ४. | नांदेड | १८४ | १४८ | २३१५ | १३३१ | ३६४६ |
| ५. | लातूर | २४६ | २४६ | २८२९ | २२५१ | ५०८० |
| ६. | उस्मानाबाद | ७५ | ५७ | ८९७ | ५३९ | १४३६ |
| ७. | गडचिरोली | ४३ | ३५ | ३५२ | ५०९ | ८६१ |
| ८. | जालना | २१५ | १०४ | ६९० | १२४० | १९३० |
| ९. | बीड | ४१० | ३०० | ४०७७ | ३७८८ | ७८४५ |
| १०. | धुळे | १०८ | १०८ | १२५६ | ८५५ | २१११ |
| ११. | नंदूरबार | ५२ | २४ | ३७६ | २४८ | ६२४ |
| १२. | पिंपरी चिंचवड, म.न.पा. | ३५ | ३५ | ३८५ | ४५० | ८३५ |
| १३. | पुणे, म.न.पा. | १६ | १६ | १५१ | १८० | ३३१ |
| १४. | नागपूर, म.न.पा. | ३४ | ३४ | ३५८ | ३४५ | ७०३ |
| १५. | कोल्हापूर, म.न.पा. | ४ | ४ | ३० | ५४ | ८८ |
| १६. | सांगली-मिरज, म.न.पा. | १५ | १५ | १६४ | १४१ | ३०० |
| १७. | अमरावती, म.न.पा. | १७ | १७ | २७८ | १२० | ३९८ |
| १८. | नाशिक, म.न.पा. | ४३ | ४३ | ५७३ | ५६४ | ११३७ |
| १९. | ठाणे, म.न.पा. | ३६ | २४ | ३२५ | २९५ | ६२० |
| २०. | कल्याण-डोंबिवली, म.न.पा. | ४ | ४ | ३२ | ४८ | ८० |
| २१. | सोलापूर, म.न.पा. | १३४ | १३० | ११७४ | १५०६ | २६८० |
| २२. | पुणे, जिल्हा परिषद | ४१ | २८ | ५४०७ | ४६५ | ५८७२ |
| २३. | अहमदनगर, जिल्हा परिषद | ३४ | २६ | ३६८ | ३७९ | ७४७ |
| २४. | रायगड, जिल्हा परिषद | १८ | १७ | १७९ | २१६ | ३९५ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| २५. | नाशिक, जिल्हा परिषद | ११० | १०४ | १२४० | ९२१ | २१६१ |
| २६. | जळगाव, जिल्हा परिषद | २१३ | २१३ | २२६६ | २०४५ | ४३११ |
| २७. | ठाणे, जिल्हा परिषद | १३१ | १३१ | १९१५ | १७७८ | ३६९३ |
| २८. | सातारा, जिल्हा परिषद | २६ | २६ | २७६ | २९९ | ५७५ |
| २९. | कोल्हापूर, जिल्हा परिषद | ६ | ६ | ७१ | ६३ | १३४ |
| ३०. | सांगली, जिल्हा परिषद | ५ | ५ | ७१ | ५९ | १३० |
| ३१. | रत्नागिरी, जिल्हा परिषद | २ | १ | २६ | १६ | ४२ |
| ३२. | सिंधुदुर्ग, जिल्हा परिषद | १ | १ | १० | ११ | २१ |
| ३३. | अमरावती, जिल्हा परिषद | २९ | २७ | ६२० | ५७८ | ११९८ |
| ३४. | अकोला, जिल्हा परिषद | ३४ | ३४ | ३८३ | ३०० | ६८३ |
| ३५ | नागपूर , जिल्हा परिषद | १० | ०८ | १३४ | १०१ | २३५ |
| | **एकूण** | **३१०३** | **२६१०** | **३४८९५** | **२६८८१** | **६८४८८** |

## वस्तीशाळा आहे तरी काय ?.....

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण कार्यक्रमामध्ये पर्यायी शिक्षणाचे वरीलप्रमाणे निरनिराळे पर्याय प्रकल्प जिल्ह्यांमध्ये राबविल्यानंतर त्या अनुभवांच्या आधारे व्यापक प्रमाणात शाळाबाह्य व बालकामगार मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सोडविण्याबाबत महाराष्ट्र शासनाने दिनांक १८ एप्रिल २००० व २० मार्च २००१ च्या आदेशान्वये 'वस्तीशाळा' योजना कार्यान्वित केली.

६-१४ वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देणे ही शासनाची जबाबदारी असल्याने राज्यामध्ये प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपविण्यात आलेली आहे. ही जबाबदारी पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने राज्यात १.५ कि.मी. परिसर व २०० लोकसंख्येसाठी प्राथमिक शाळांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तर आदिवासी, दुर्गम व डोंगराळ भागात ही सुविधा १ कि.मी. परिसर व १०० लोकवस्तीसाठी उपलब्ध करून देण्यात येते.

वरील निकषानुसार शाळा सुरू करण्यात येत असल्या तरी हे निकष पूर्ण न करणाऱ्या अनेक वस्त्या, पाडे, तांडे आहेत जेथे प्राथमिक शाळेची आवश्यकता भासते. विशेषतः नद्या, नाले, डोंगराळ भाग, दुर्गमता इत्यादी नैसर्गिक अडचणींमुळे ६-९ वयोगटातील मुलांना जवळच्या इतर गावातील किंवा वस्तीवरील प्राथमिक शाळेत जाणे अडचणीचे होते. या सर्व बाबींचा विचार करता प्राथमिक शाळांना पर्यायी सुविधा उपलब्ध करून देणे हा अनिवार्य भाग आहे. म्हणूनच शासनाने वस्तीशाळा सुरू केल्या आहेत.

## वस्तीशाळेचे स्वरूप.....

- **वस्तीशाळेचे स्वरूप :**
  - वस्तीशाळेचे स्वरूप अनौपचारिक असेल. वस्तीशाळा ही बहुवर्ग प्राथमिक शाळा असेल.
  - ग्रामशिक्षण समितीस वस्तीशाळेची मागणी करता येईल.
  - वस्तीशाळेत इयत्ता १ली ते ४थी पर्यंतचा राज्य शासनाचा नियमित अभ्यासक्रम शिकविला जाईल.
  - प्रत्येक विद्यार्थ्यास स्वतःच्या गतीने अभ्यासक्रम पूर्ण करता येईल.
  - वस्तीशाळा नियमित प्राथमिक शाळेप्रमाणे पूर्णवेळ चालू राहील.

- **वस्तीशाळा सुरू करण्यासाठी निकष :**
  - एक कि.मी. परिसरात प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध नसलेल्या ठिकाणी वस्तीशाळा सुरू करता येईल. मात्र आवश्यकतेनुसार ही अट शिथिल करता येईल.
  - प्रत्येक वस्तीशाळेत इयत्ता १ली ते ४थी साठी एकत्रित सुमारे १५ (पंधरा) पर्यंत विद्यार्थी असणे आवश्यक आहे.
  - वस्तीशाळा सुरू करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत / ग्रामशिक्षण समिती/ग्रामस्थ यांनी विनामूल्य जागा उपलब्ध करून देणे अनिवार्य राहील.

- **सर्वेक्षण आणि आर्थिक तरतुदी :**
  - जिल्हा स्तरावर सर्वेक्षणातून प्राप्त झालेल्या ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य मुलांच्या माहितीच्या आधारे आवश्यक तरतुदीची मागणी करावी.
  - शिक्षण संचालकांनी सर्व जिल्ह्यातून वस्तीशाळा योजनेअंतर्गत आलेले प्रस्ताव एकत्रित स्वरूपात आर्थिक तरतूद करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाकडे पाठवावेत.

- **वस्तीशाळेची मागणी**
  - संबंधित शहराच्या/गावाच्या नगरपालिका/ नगर परिषदा/ महानगरपालिका / ग्रामपंचायत / ग्रामशिक्षण समितीस वस्तीशाळेची मागणी वर्षात कधीही शिक्षण अधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद यांचेकडे करता येईल.
  - वस्तीशाळेची मागणी शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचेकडे गटशिक्षणाधिकारी यांचेमार्फत करता येईल.

| | |
|---|---|
| • **वस्तीशाळेचे व्यवस्थापन व प्रशासन :** | • वस्तीशाळा चालविण्याची संपूर्ण जबाबदारी ग्रामपंचायत / ग्रामशिक्षण समिती यांची राहणार असून वस्तीशाळेचे व्यवस्थापन आणि प्रशासन त्यांनी सांभाळावयाचे आहे. वस्तीशाळेसाठी विहित केलेल्या अर्हतेच्या स्वयंसेवी शिक्षकांची नियुक्तीही संबंधित व्यवस्थापनामार्फत केली जाईल.<br>• ग्रामशिक्षण समितीचे अध्यक्ष व समितीचे सचिव (मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा) यांचे नावे संयुक्त बँक खाते उघडण्यात येईल. |
| • **वस्तीशाळा सुरू करण्याची कार्यपद्धती :** | • वस्तीशाळेची मागणी प्राप्त झाल्यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी मागणी केलेल्या ठिकाणी वस्तीशाळेच्या आवश्यकतेची तपासणी करवून घेतील व प्रस्ताव शिक्षण समितीपुढे सादर करतील.<br>• वस्तीशाळेच्या मागणीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून एक महिन्यात जिल्हा परिषद , शिक्षण समिती, शिक्षण संचालक (प्राथ.) यांना शिफारस करतील.<br>• जिल्ह्याकडून वस्तीशाळेची शिफारस प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांचे आत शिक्षण संचालक (प्राथ.) वस्तीशाळेच्या मान्यतेबाबत निर्णय संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि.प. यांना कळवतील. |
| • **वस्तीशाळेची आवश्यकता निश्चित करण्यासाठी शिक्षण समितीने विचारात घ्यावयाचे मुद्दे :** | • प्रस्तावित वस्तीवर इ. १ली ते ४थी ची एकत्रित सुमारे १५ (पंधरा) मुलामुलींची यादी.<br>• वस्तीशाळेसाठी योग्य जागा विनामूल्य उपलब्ध करून देण्याबाबत ग्रामपंचायतीचे हमीपत्र.<br>• वस्तीशाळेच्या नियोजित ठिकाणापासून सर्वांत जवळील नियमित शाळेचे अंतर.<br>• ग्रामशिक्षण समितीचा वस्तीशाळेबाबत मागणी ठराव. |
| • **वस्तीशाळेचा कालावधी :** | • वस्तीशाळा दरवर्षी सोयीच्या कालावधीत किमान २०० दिवसांसाठी चालू राहील.<br>• वस्तीशाळा नियमित शाळेप्रमाणेच दररोज पूर्णवेळ चालू राहील. वस्तीशाळेची वेळ संबंधित व्यवस्थापन निश्चित केल्याप्रमाणे राहील. |

- **वस्तीशाळेसाठी स्वयंसेवी शिक्षकाची अर्हता व नियुक्ती :**
  - स्वयंसेवी शिक्षकांची नियुक्ती स्थानिक उमेदवारामधून करण्यात येईल व महिला उमेदवारांना प्राधान्य राहील.
  - स्वयंसेवी शिक्षकाची अर्हता अध्यापन पदविका (डी.एड.) राहील.
  - स्थानिक डी.एड. उमेदवार उपलब्ध नसल्यास किमान इयत्ता १२वी उत्तीर्ण स्थानिक उमेदवाराची नियुक्ती करता येईल.
  - स्थानिकरीत्या वरील दोन्ही अर्हतेचे उमेदवार उपलब्ध नसल्यास लगतच्या गावातील / वस्तीतील डी.एड. उमेदवाराची नियुक्ती करता येईल.
  - स्थानिक डी.एड. अथवा स्थानिक १२वी उत्तीर्ण अथवा लगतच्या वस्ती/गावातील डी.एड. उमेदवारही उपलब्ध नसल्यास लगतच्या वस्ती/गावातील इ. १२वी उत्तीर्ण उमेदवाराची नियुक्ती करता येईल.
  - स्वयंसेवी शिक्षकाची नियुक्ती १० महिन्यांसाठीच करार पद्धतीने मानधनावर संबंधित व्यवस्थापनामार्फत केली जाईल.
  - या संदर्भात स्वयंसेवी शिक्षकांबरोबर करावयाच्या करारपत्रात नमुना नियुक्ती आदेश व कराराच्या अटी व शर्ती सोबत परिशिष्टात देण्यात आल्या आहेत.

- **महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांची जबाबदारी आणि स्वयंसेवी शिक्षकांचे प्रशिक्षण :**
  - वस्तीशाळा मंजूर झाल्यावर संबंधित व्यवस्थापनाने वस्तीशाळेसाठी स्वयंसेवी शिक्षकाची नियुक्ती तत्काळ करावी.
  - स्वयंसेवी शिक्षकाने वस्तीशाळेत अध्यापनास सुरुवात करण्यापूर्वी त्याला किमान ३० दिवस प्रशिक्षण देण्यात येईल. हे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शनाखाली संबंधित जिल्ह्यातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेची राहील. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने वस्तीशाळेतील शिक्षकांसाठी प्रशिक्षणाचा तपशील तयार करावा व त्याआधारे प्रत्यक्ष प्रशिक्षण जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमार्फत आयोजित करावे.
  - या संदर्भातील आर्थिक प्रस्ताव परिषदेने शासनास सादर करावा.
  - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांकडे या शाळांसाठी आवश्यक असलेले शैक्षणिक साहित्य विकसित करण्याची व स्वयंसेवी शिक्षकांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी राहील.

- **वस्तीशाळेसाठी अनुदान :**
  - एक वस्तीशाळेसाठी दरवर्षी रु. १३,०००/- मर्यादेपर्यंत अनुदान शासनाकडून दिले जाईल. अनुदानाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-


| | | |
|---|---|---|
| १. | शिक्षकाचे मानधन दरमहा (रु. १,०००/- x १० महिने ) | रु. १०,०००/- |
| २. | शिक्षकाचे प्रशिक्षण | रु. १,०००/- |
| ३. | सादील खर्च | रु. १,०००/- |
| ४. | पाठ्यपुस्तके (रु. ४०/- प्रति विद्यार्थी) | रु. १,०००/- |
| | एकूण वार्षिक खर्च | रु.१३,०००/- |

  - प्रशिक्षणावरील खर्च वगळता अन्य सर्व बाबीवर दर्शविलेला खर्च संबंधित स्थानिक व्यवस्थापनाकडे सुपूर्त करण्यात येईल.
  - वस्तीशाळेसाठीचे शासन अनुदान शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण यांचेमार्फत संबंधित जिल्हा परिषदांना वर्ग करण्यात येते.

- **स्वयंसेवी शिक्षकाचे मानधनः** स्वयंसेवी शिक्षकाला दरमहा रु. १,०००/- (रुपये एक हजार) मानधन पुढील महिन्याच्या ७ तारखेपर्यंत धनादेशाद्वारे संबंधित व्यवस्थापनामार्फत अदा करण्यात येईल.

- **वस्तीशाळांतील अभ्यासक्रम :** वस्तीशाळेचा अभ्यासक्रम आणि सातत्यपूर्ण मूल्यमापन इत्यादी बाबी नियमित शाळेप्रमाणेच राहील.

## *आणि शीतल वस्तीशाळेत आली.....*



**शी**तल , सात वर्षांची मुलगी. चार भावंडांतील एक. घरी थोडंसे शेत. ते कोरडवाहू असल्यामुळं उदरनिर्वाहाला ते पुरेसं नाही. वडील हॉटेलवर थोडा वेळ काम करतात. पावसाळा-हिवाळ्यात शेतातील कामं संपली की पूरक म्हणून दूध-दुभत्याचा व्यवसाय. त्याला थोडाफार मुलांचाही हातभार लागतो.

'शेतातून थोडा चारा आण. गि-हाईकास दूध नेऊन दे'. या सगळ्या गोष्टींमुळे शाळेकडं मात्र होतं दुर्लक्ष. गावात अभियान आलं, कलापथकं आली. ग्रामशिक्षण समितीचे लोक घरोघरी फिरले. त्यांना शाळेबाहेरील अनेक मुलं सापडली. त्यातलीच एक शीतलही. शीतल रंगनाथ पावडे. इयत्ता दुसरीपर्यंत शिकून घरी बसलेली. शाळा दूर असल्याने शीतल घरीच बसलेली. आता तिच्याच वस्तीत अर्धापुरातील दत्तनगरात वस्तीशाळा आली. शाळेत शिकवायला बाई त्याच शाळेतल्या.

मग काय? हळूहळू गल्लीतली सारी मुलं शाळेत जाऊ लागली. शीतलही आली. रमली. शिकू लागली. आता ती नियमितपणे शाळेत जाते. फाडफाड वाचते. बाईंना शिकवायचा आग्रह करते. शीतलचे वडीलही आता निश्चिंत झालेयत. शीतल आईला सकाळी थोडेबहुत कामही करू लागते. शेजाऱ्यांना दूधही देते आणि खूप अभ्याससही करते. तिचे आजोबा शाळेत येतात. तिला शिकताना बघतात. तिला शाळेत घेऊन येतात. कधी कधी न्यायलाही येतात. शीतलसारखी अनेक मुले वस्तीशाळेत आली हे या योजनेचं यशच म्हणावं लागेल.




**शि**रपूर तालुक्यातील रूदावली म्हणजे सधन शेतकऱ्यांचे गाव. शेजारी प्रति पंढरपूर समजले जाणारे श्रीक्षेत्र बाळदे गाव. शिरपूर तालुका मध्य प्रदेश राज्याच्या सीमेलगतचा.

मध्य प्रदेशमधील व या तालुक्यातील 'पावरा' या आदिवासी समाजातील कुटुंबे या सधन शेतकऱ्यांच्या शेतीत सालगडी म्हणून काम करतात. त्यांची मुले तशी शाळेपासून वंचितच राहिलेली.

त्याच गावातील उपसरपंचानी माळरानांवर वस्तीशाळा सुरू करण्याच्या प्रस्ताव पाठविला. अग्रवाल नावाच्या मळा मालकांनी आपल्या मळ्यातील शेतीची अवजारे ठेवण्यासाठी बांधलेली खोली वस्तीशाळेसाठी दिली.

त्यांनीच स्वच्छतेसाठी पाण्याचा एक हौदही बांधून दिला. एवढेच नव्हे तर स्वच्छतेसाठी साबणही तेच पुरवतात. आता शाळेची सुरुवात स्वच्छतेने होते.

सर्व मुले शाळेत प्रवेश करण्यापूर्वी साबणाने हातपाय स्वच्छ धुतात. मगच वर्गात प्रवेश करतात.

शाळेसाठी निर्माण झालेल्या या चांगल्या वातावरणामुळे गावकऱ्यांनी स्वयंस्फूर्तीपणे २४ विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन साहित्य पुरविले आहे.


ही मुले आता इंग्रजीतसुद्धा गाणी म्हणतात. ती ऐकताना त्यांच्या पालकांनाही खूप आनंद होतो. ते त्यांच्या बोलीभाषेत तो व्यक्त करतात.

समाजाच्या मुख्य शैक्षणिक प्रवाहात त्यांना आणण्यासाठी सर्वजणच प्रयत्नशील आहेत.

- **वस्तीशाळा संख्या - १०७ (शिरपूर गट)**
- **विद्यार्थी संख्या - २६०३**

  **मुले - १३४७**

  **मुली - १२५६**



**गा**व तिथं मंदिर असतं. मंदिराच्या पायरीवर माथा टेकला की मन चैतन्यानं भरून जातं. देव देव्हाऱ्यात असतो. लोक भजन-कीर्तन दंग होऊन ऐकतात. असं एकूणच गावचं वातावरण असतं.

उस्मानाबाद जिल्ह्यातील येडशी हे असंच एक गाव. जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष, रामेश्वरजी करंडे हे याच गावचे. येडशी येथील वस्तीत नवीन शाळा सुरू करण्याचा संकल्प झाला. गावात वस्तीशाळा आली. मग ती कुठे भरवायची? गावकऱ्यांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ती मंदिरात भरवण्यावर सर्वांचे एकमत झाले. गावकऱ्यांनी ठरवूनही टाकलं. मुले ही देवाघरची फुले. मग त्यांना येथेच फुलू द्या.


गावकऱ्यांनी दर्शनाची वेळ बदलली, आरतीची वेळ बदलली.

ज्या वेळात शाळा भरते, त्या वेळेत गावकरी दर्शनाला येत नाहीत. शाळा सुटली की देवदर्शन सुरू.

आपल्या गावचं पवित्र मंदिर शिक्षणासारख्या पवित्र कार्याला देऊन गावकऱ्यांनी शिक्षणाचे महत्त्व खरंच ओळखलं आहे.

असे असावेत गावकरी नि अशी असावी शाळा.

## आणि मुलांची पायपीट थांबली .....



विश्रामपूर हे गडचिरोली जिल्ह्यातील गाव गडचिरोली - धानोरा रोडवर वसलं आहे. गावाची लोकसंख्या २३२. गडचिरोलीपासून अवघ्या नऊ किलोमीटर अंतरावर. तरीही शैक्षणिकदृष्ट्या दुर्लक्षित राहिलेले.

प्राथमिक शिक्षणाची कसलीही सोय त्या गावी नव्हती. विश्रामपूरपासून २ किलो मीटरवर असलेल्या मेढा या गावी जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आहे. ५-६ वर्षांची परिषदेची प्राथमिक शाळा आहे. ५-६ वर्षांची चिमुकली मुले पाण्या पावसात, उन्हातान्हांत पायपीट करून दोन किलोमीटर एवढे अंतर कापून जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये जाण्यास केवळ असमर्थ असलेली. परिणामी जिल्हा परिषद शाळेतील अनुपस्थिती बाढत होती आणि विश्रामपूर या गावातील मुलांची पाटी कोरीच राहिली. ज्या गावी शाळा नाही, त्या गावी वस्तीशाळा सुरू होणार आहे अशी माहिती गावकऱ्यांपर्यंत, ग्रामशिक्षण समितीपर्यंत पोहचली. माझ्या गावी शाळा व्हावी या उद्देशाने माहिती गोळा करण्यास्तव व प्रस्तावाचा नमुना प्राप्त करण्याकरिता अनेकजण कार्यालयामध्ये येत होती. ग्रामपंचायत बोधली येथील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामशिक्षण समिती सदस्य यांनी वस्तीशाळेचा प्रस्ताव सादर केला व गावातीलच कु. बेबीनंदा पूनाजी सहारे या बारावी पास असलेल्या मुलीची स्वयंसेवी शिक्षिका म्हणून निवड करण्यात आली. स्वयंसेवक शिक्षकांचे २० दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर २ जुलै २००१ पासून विश्रामपूर येथे वस्तीशाळा सुरू झाली आणि वस्तीवरच्या २० मुलांची पायपीट थांबली.

### जिल्हा : गडचिरोली

| | | | |
|---|---|---|---|
| • मंजूर वस्तीशाळा : | १३५ | | |
| कार्यरत : | ९४ | | |
| प्रशिक्षित स्वयंसेवक : | १०४ | | |
| पटसंख्या : | मुले | मुली | एकूण |
| | ८२५ | ८८० | १७०५ |

राज्यात अशा वस्तीशाळांमुळे ७९,४८० मुलांच्या आयुष्यात शिक्षणाची संधी त्यांच्या राहत्या गावी/तांड्यावर उपलब्ध झाली आहे. या वस्तीशाळेची जिल्हानिहाय माहितीपुढील प्रमाणे :

| अ.क्र. | जिल्हा | वस्तीशाळा | विद्यार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | औरंगाबाद | २८० | ३०९६ | २४७५ | ५८५१ |
| २. | परभणी | ९७ | ११९४ | १०४८ | २३३९ |
| ३. | नांदेड | ९८ | ११७८ | १०६८ | २३४४ |
| ४. | लातूर | ५५ | ५७० | ६२९ | १२५४ |
| ५. | उस्मानाबाद | १०० | ११२२ | १०७६ | २२९८ |
| ६. | बीड | २७३ | ३०६० | २७३९ | ६०७२ |
| ७. | जालना | १५६ | १८५१ | १७१३ | ३७२८ |
| ८. | धुळे | ४८७ | ६०१७ | ५५१४ | १२०१८ |
| ९. | गडचिरोली | ९४ | ८२५ | ८८० | ११७९ |
| १०. | ठाणे | १४५ | ५५७५ | ४७८२ | १०३५७ |
| ११. | रत्नागिरी | ९३ | | | - |
| १२. | रत्नागिरी | ६८ | ५५७ | ४९४ | १०५१ |
| १३. | सिंधुदुर्ग | २४ | १२९ | १६५ | २९४ |
| १४. | नाशिक | १४७ | २४५७ | २३४७ | ४८०८ |
| १५. | जळगाव | १०० | १२३० | १०८३ | २३१३ |
| १६. | अहमदनगर | २३६ | २२५४ | २१०२ | ४३५६ |
| १७. | पुणे | १६८ | १३५४ | १२५५ | २६०९ |
| १८. | सातारा | १४० | - | - | १९५१ |
| १९. | सांगली | ७८ | ६५० | ५६५ | १२१५ |
| २०. | सोलापूर | २९१ | २९६० | १९७७ | ४९३५ |
| २१. | कोल्हापूर | १८४ | १८८० | १४१८ | २९६८ |
| २२. | बुलढाणा | ७३ | ७२५ | ३३३ | १०५८ |
| २३. | अकोला | १६ | १५३ | ११२ | २६५ |
| २४. | वाशिम | ३३ | ७०५ | ५५५ | १२६० |
| २५. | अमरावती | ४२ | - | - | - |
| २६. | वर्धा | ०८ | १६० | १५० | ३१० |
| २७. | नागपूर | ४९ | ३४७ | ३३१ | ६७८ |
| २८. | भंडारा | १८ | ७२ | ८२ | १५४ |
| २९. | गोंदिया | ९३ | ५९३ | ५९६ | ११८९ |
| | एकूण | ३६४५ | ४०३९२ | ३५४८९ | ७९४८० |

| अ.क्र. | बाब | वस्तीशाळा | महात्मा फुले शिक्षण हमी केंद्र |
|---|---|---|---|
| १. | **शासन निर्णय** | क्रमांक : पीआरई १०९९/२१७५ प्राशि- १, दि. १८ एप्रिल २००० क्रमांक : पीआरई १०९९/२१७५ प्राशि -१, दि. २० मार्च २००१ | क्रमांक : पीआरई २०००/(२६०१)/प्राशि-१ दिनांक १३ ऑक्टोबर२००० क्रमांक: पीआरई २०००/(२६०१)/प्राशि-१ दिनांक १५ मे २००१ |
| २. | **योजनेचे नाव केंद्र शासन : समांतर नाव** | वस्तीशाळा Education Guarantee Scheme (EGS) | महात्मा फुले शिक्षण हमी योजना Alternative & Innovative Education (AIE) |
| | | **** साम्य **** | |
| ३. | **स्वरूप** | अनौपचारिक बहुवर्ग प्राथमिक शाळा | अनौपचारिक शिक्षण बहुवर्ग केंद्र |
| ४. | **वयोगट** | ६ ते १४ | ६ ते १४ |
| ५. | **समकक्षता** | इ. १ ते ४ | इ. १ ते ४ ७वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय |
| ६. | **जागा** | ग्रामपंचायत/ ग्रामशिक्षण समिती/ ग्रामस्थ यांनी विनामूल्य उपलब्ध करून द्यावी. | सार्वजनिक / ग्रामपंचायत /ग्रामशिक्षण समिती यांनी विनामूल्य उपलब्ध करून द्यावी. |
| ७. | **शिक्षकाचे किमान वय** | १८ वर्ष | १८ वर्ष |
| ८. | **दस्तऐवज** | नियमित शाळेप्रमाणे | शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी विहित केल्यानुसार |
| ९. | **प्रशिक्षण कालावधी** | ३० दिवस (अध्यापनास सुरुवात करण्यापूर्वी) | ३० दिवस (सेवापूर्व) |
| १०. | **अनुधावन प्रशिक्षण उद्‌बोधन** | दरमहा दोन दिवस केंद्रपातळीवर | दरमहा दोन दिवस |
| ११. | **प्रशिक्षणाची जबाबदारी शैक्षणिक साहित्य विकसन** | म.रा.शै.सं. व प्र. परिषद, पुणे मार्फत डायट (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था) | म.रा.शै.सं. व प्र. परिषद, पुणे मार्फत डायट (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था) |
| १२. | **भेटी** | गटशिक्षणाधिकारी /शिक्षण विस्तार अधिकारी - दर तीन महिन्यांनी | गटशिक्षणाधिकारी / प्राधिकृत अधिकारी |

| अ. क्र | बाब | वस्तीशाळा | महात्मा फुले शिक्षण हमी केंद्र |
|---|---|---|---|
| १३. | मुख्य उद्दिष्ट | औपचारिक शिक्षण प्रवाहात इ. ५वी मध्ये दाखल करणे | सर्वेक्षणानुसार ६-१४ वयोगटातील शाळाबाह्य मुलांच्या इ. १ली ते ४थी पर्यंतच्या समकक्ष शिक्षणाची सोय उपलब्ध करून अशा मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात येण्याची संधी उपलब्ध करून देणे तसेच मुलाचे वय व संपादणूक लक्षात घेऊन ७वी पर्यंतच्या समकक्ष शिक्षणाची सोय करणे. |
| | | ** फरक ** | |
| १४. | ठिकाण | शाळाविरहित वस्ती | गरजेनुसार कोठेही |
| १५. | निकष :<br>१. लोकसंख्या<br>२. अंतर | <br>अट नाही<br>१ कि.मी. परिसरात शाळा उपलब्ध नसणे.(आवश्यकतेनुसार शिथिलक्षम) | <br>अट नाही<br>अट नाही |
| १६. | किमान विद्यार्थी संख्या | सुमारे १५ पर्यंत (इ. १ ते ४) | १५<br>यापेक्षा कमी विद्यार्थ्यांसाठी केंद्र चालविता येऊ शकेल. |
| १७. | कमाल विद्यार्थी संख्या | अट नाही | २० |
| १८. | लाभार्थी | शाळाविरहित वस्तीतील मुलांसाठी | शाळाबाह्य मुले व बालकामगार तसेच शाळाबाह्य अपंग मुले |
| १९. | अभ्यासक्रम व मूल्यमापन | औपचारिक शाळेप्रमाणे (पाठ्यपुस्तके- बालभारती) | १. अनौपचारिक<br>२. एस.सी.ई.आर.टी.ने विकसित करावयाचा आहे तोपर्यंत आय.आय.ई., पुणे यांचा अभ्यासक्रम.<br>३. स्थानिक गरज लक्षात घेऊन स्वयंसेवी संस्थेने स्वतंत्र अभ्यासक्रम विकसित केल्यास त्यास एस.सी.ई.आर.टी.ची मान्यता घ्यावी लागेल. |

| अ. क्र | बाब | वस्तीशाळा | महात्मा फुले शिक्षण हमी केंद्र |
|---|---|---|---|
| २०. | मागणी | ग्रामशिक्षण समिती / ग्रामपंचायत अर्जाचा नमुना - जोडपत्र-ब प्रमाणे गटशिक्षणाधिकारी मार्फत | स्वयंसेवी संस्था / ग्रामशिक्षण समिती/ ग्रामपंचायत (अर्जाचा नमुना प्राथमिक शिक्षण संचालक यांनी विहित केल्यानुसार) |
| २१. | व्यवस्थापन | ग्रामपंचायत / ग्रामशिक्षण समिती | - पंजीकृत स्वयंसेवी संस्था (प्राधान्य)<br>- पंजीकृत शिक्षण संस्था<br>- स्थानिक स्वराज्य संस्था |
| २२. | आर्थिक व्यवहार | ग्रामशिक्षण समितीचे अध्यक्ष व सचिव (मुख्याध्यापक प्राथमिक शाळा) यांचे संयुक्त बँक खाते | - स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत वस्तीशाळेप्रमाणे<br>- पंजीकृत संस्थेसंदर्भात संस्थेच्या नावे |
| २३. | निदेशक पदनाम | स्वयंसेवी शिक्षक | केंद्र स्वयंसेवक / केंद्र चालक |
| २४. | निदेशक पात्रता | अ. स्थानिक उमेदवार डी.एड. (महिला उमेदवाराना प्राधान्य )<br>ब. स्थानिक उमेदवार इ.१२वी उत्तीर्ण<br>क. 'अ' प्रमाणे उमेदवार उपलब्ध नसल्यास लगतच्या गावातील डी.एड. उमेदवार<br>ड. 'अ' व 'ब' प्रमाणे उमेदवार उपलब्ध नसल्यास लगतच्या गावातील इ. १२वी उत्तीर्ण | १. स्थानिक उमेदवार<br>२. महिला व डी.एड. उत्तीर्ण यांना प्राधान्य<br>३. बारावी उत्तीर्ण उपलब्ध नसल्यास इ. १०वी उत्तीर्ण<br>सेवानिवृत्त शिक्षक / राष्ट्रीय सेवायोजन / एन.सी.सी. नेहरू युवा केंद्राचे कार्यकर्ते यांचा विचार व्हावा. जि.प./नगरपालिका, महानगरपालिका यांच्या स्थानिक शिक्षकांनाही अतिरिक्त जबाबदारी घेता येईल. |
| २५. | कालावधी | पूर्णवेळ नियमित प्राथमिक शाळेप्रमाणे | चार घड्याळी तास |
| २६. | कार्यकाल | शैक्षणिक वर्षात सोयीच्या कालावधीत किमान २०० दिवस | सलग २ वर्षे<br>(सदर केंद्र शैक्षणिक वर्षात केव्हाही सुरू करता येईल.) |
| २७. | नियुक्ती प्राधिकारी | ग्रामपंचायत /ग्रामशिक्षण समिती यांचे मंजुरीने आणि सचिव यांचे स्वाक्षरीने | त्या-त्या कार्यकारी समितीच्या मान्यतेने नियुक्ती प्राधिका-याची स्वाक्षरी (जि.प./म.न.पा./न.प./ स्वयंसेवी संस्था) |
| २८. | शिक्षक नियुक्ती कालावधी | १० महिने कालावधीसाठी करारपद्धतीवर/ जोडपत्र 'क' रु. २०/- च्या स्टॅम्पवर करारनामा | १२ महिने कालावधीसाठी करारपद्धतीवर |

| अ.क्र. | बाब | वस्तीशाळा | महात्मा फुले शिक्षण हमी केंद्र |
|---|---|---|---|
| २९. | आर्थिक तरतूद (वार्षिक युनिट कॉस्ट ) | | |
| | १. निदेशकाचे मानधन | रु. १०,०००/- दरमहा रु. १,००० प्रमाणे (१० महिने x १,०००/-) | रु. १२,०००/- (किमान १७ मुली / २० मुले-मुली ) प्रतिमाह रु. १००० x १२ महिने (कमाल) |
| | २. शिक्षकाचे प्रशिक्षण | रु. १,०००/- | रु. १,२२५/- |
| | ३. सादील खर्च | रु. १,०००/- | रु. २,०००/- |
| | ४. पर्यवेक्षण मानधन | निकटतम शाळेचे मु.अ. नियंत्रक | रु. ९००/- |
| | ५. पाठ्यपुस्तके | रु. १,०००/-(रु.४०/-प्रति विद्यार्थी ) | रु. २,५००/- |
| | **एकूण** | **रु. १३,०००/-** | **रु. १८,६२५/-** |
| ३०. | दैनंदिन पर्यवेक्षण | निकटतम प्राथमिक शाळेचा मुख्याध्यापक | योजनेतील तरतुदीनुसार |
| ३१. | तपासणी/ संनियंत्रण | केंद्र प्रमुख (महिन्यातून किमान १ भेट) / गटशिक्षणाधिकारी / शिक्षण विस्तार अधिकारी | गटशिक्षणाधिकारी |
| ३२. | निदेशक मानधन द.म. | रु. १०००/- | विद्यार्थी संख्येनुसार रु. ५०/- प्रति विद्यार्थी (कमाल रु. १०००/-) |

इतर डी.पी.ई.पी. राज्यातील पर्यायी शिक्षण योजनांचे वर्गीकरण पुढील सहा प्रकारे करता येईल :-

- लहान दुर्गम वस्त्यातील मुलांसाठी पर्यायी शिक्षण.
- स्थलांतरित कुटुंबातील मुलांसाठी पर्यायी शिक्षण.
- घरगुती कामात गुंतलेल्या मुलांसाठी पर्यायी शिक्षण.
- बालकामगार मुलांसाठी पर्यायी शिक्षण.
- धार्मिक शिक्षण घेणाऱ्या शाळाबाह्य मुलांसाठी पर्यायी शिक्षण.
- मुलींसाठी विशेष पर्यायी शिक्षण.

**लहान दुर्गम वस्त्यातील मुलांसाठी पर्यायी शिक्षण योजना**

**मध्य प्रदेश (शिक्षण हमी योजना ) :-**

**पार्श्वभूमी :** मध्य प्रदेश राज्यात शिक्षण हमी योजना जानेवारी, १९९७ पासून कार्यान्वित आहे. राजीव गांधी प्राथमिक शिक्षा मिशन ही स्वायत्त संस्था लहान व दुर्गम वस्त्यांमध्ये स्थानिक समाजाच्या मागणीनुसार शाळा सुरू करण्याची हमी देते. वस्तीने मागणीचा प्रस्ताव पाठविल्यानंतर ९० दिवसांत एक कि.मी. अंतराच्या परिसरात शाळेची सोय उपलब्ध नसलेल्या ठिकाणी अशी शिक्षण हमी योजना मान्य होऊ शकते. अहवालानुसार या राज्यात सन १९९९ मध्ये १९,२८९ शिक्षण हमी शाळा ८ लाख ५० हजार विद्यार्थ्यांसाठी कार्यान्वित आहेत.

**स्वरूप :** शिक्षण हमी योजना केंद्रातील शिक्षकास ‘ गुरुजी ’ असे संबोधले जाते. गुरुजी स्थानिक व्यक्ती असून जनपथ शिक्षा समितीतर्फे त्याची नेमणूक होते. गुरुजींच्या नेमणुकीत महिला उमेदवारास प्राधान्य दिले जाते. ६ ते ११ वयोगटातील किमान ४० मुलांसाठी आणि आदिवासी क्षेत्रासाठी किमान २५ विद्यार्थ्यांसाठी अशी शाळा सुरू करता येते. एकापेक्षा अधिक गुरुजी असलेल्या शाळेत किमान एक महिला असणे आवश्यक असते. गुरुजींसाठी किमान शैक्षणिक अर्हता इयत्ता १२वी उत्तीर्ण अशी निर्धारित करण्यात आली असून अपवादात्मक परिस्थितीत ही अर्हता इयत्ता १०वी उत्तीर्ण ठेवलेली आहे. वर्षातून शाळेचे कार्यदिन किमान २०० असतात. वर्षातून दोन वेळा विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले जाते. शाळेत इ. १ली ते ५वी वर्गाचे शिक्षण दिले जाते.

**इतर बाबी :**

- गुरुजींना २० दिवसांचे सेवापूर्व प्रशिक्षण देण्यात येते. दुसऱ्या वर्षापासून १४ दिवसांच्या आवर्ती प्रशिक्षणांची सोय करण्यात आली आहे.
- केंद्र समन्वयक केंद्रांना भेटी देऊन शैक्षणिक मार्गदर्शन करतात. गाव पातळीवर ग्रामपंचायतीचे शाळेवर संनियंत्रण असते.

**केंद्रासाठी आर्थिक तरतूद (एका वर्षासाठी )**

| अ. क्र | खर्चाची बाब | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १. | गुरुजीचे मानधन रु. १०००/- दरमहा | १२,०००.०० |
| २. | गुरुजीचे प्रशिक्षण - २० दिवसासाठी | १,०१०.०० |
| ३. | सादिलवार खर्च | ८५०.०० |
| ४. | पुस्तके विद्यार्थ्यांमागे रु. २५ प्रमाणे | १,०००.०० |
| | **एकूण** | **१४,८६०.००** |

**आंध्र प्रदेश - (समाजशाळा - Community School )**

**पार्श्वभूमी :** एक कि.मी. परिसरात शाळा नसलेल्या लहान वस्तीतील मुलांसाठी आणि विशेषकरून आदिवासी आणि समुद्रकिनाऱ्या लगतच्या भागातील किमान २०० लोकसंख्या वस्तीसाठी आंध्र प्रदेश राज्यात **समाजशाळा** काढण्यात आल्या आहेत. या राज्यातील डी.पी.ई.पी. जिल्ह्यात अहवाल वर्षात १,३९४ समाजशाळा कार्यान्वित असून ४९,११७ विद्यार्थी या शाळांतून शिक्षण घेत आहेत.

**स्वरूप :**

- औपचारिक शाळेप्रमाणे दररोज सहा तास ही शाळा चालते. प्रतिवर्षी २३५ ते २५० दिवस शाळेचे कामकाज चालते.
- शाळेत दुसऱ्या वर्गापर्यंत शिक्षण दिले जाते. यशस्वी विद्यार्थ्यांस जवळच्या औपचारिक शाळेत प्रवेश दिला जातो.
- 'समाजशाळा' या एकशिक्षकी शाळा असून १५ ते ४० विद्यार्थ्यांसाठी चालविल्या जातात. समाजशाळेतील शिक्षकास 'विद्या स्वयंसेवक' असे संबोधले जाते. ऋषी व्हॅली एज्युकेशन सोसायटी (Rishi Valley Edn. Society) ने विकसित केलेल्या बहुवर्ग साहित्य पेटीच्या मदतीने या शाळांतील वर्गाध्यापन प्रभावी झाले आहे.

**इतर बाबी :**

- 'विद्या स्वयंसेवक' ही स्थानिक व्यक्ती असून त्याची शैक्षणिक अर्हता इयत्ता १२वी उत्तीर्ण निर्धारित केलेली आहे.
- विद्या स्वयंसेवकाची शिफारस शालेय शिक्षण समिती करते. यामध्ये महिलांना प्राधान्य दिले जाते.
- विद्या स्वयंसेवकास सुरुवातीस तीन दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते त्यानंतर १० दिवसांचे प्रशिक्षण साहित्यपेटीबाबत दिले जाते.
- शाळेचे व्यवस्थापन स्थानिक समाज पाहतो.

**आर्थिक तरतूद (एका वर्षासाठी) :**

| अ.क्र. | खर्चाची बाब | रक्कम (रु.) |
| --- | --- | --- |
| १. | विद्या स्वयंसेवकाचे मानधन रु. ५०० दरमहा | ५,०००.०० |
| २. | बहुवर्ग स्वयं अध्ययन साहित्यपेटी | ३,०००.०० |
| ३. | वर्ग उभारणीसाठी तात्पुरती संरचना | ३,०००.०० |
| ४. | सादिलवार खर्च | ५००.०० |
| | **एकूण :** | **११,५००.००** |

**केरळ : (बहुवर्ग केंद्र - Multigrade Centres )**

**पार्श्वभूमी :** भारतातील इतर राज्यांच्या तुलनेने केरळ राज्याचे साक्षरतेचे प्रमाण सर्वांत अधिक आहे. परंतु सूक्ष्मनियोजन प्रक्रियेत असे निदर्शनास आले की, काही दुर्गम भागात, लहान वस्त्यांमधील मुलांसाठी शाळा उपलब्ध नाहीत. ही समस्या आदिवासी भाग आणि समुद्रकिनाऱ्यालगत भागातील मच्छिमार समाजामध्ये प्रकर्षाने आढळली. अशा वस्त्यामध्ये बहुवर्ग केंद्र सुरू करण्यात आले. अहवालानुसार सन १९९९ मध्ये ४९ केंद्रातून ११०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**स्वरूप :** बहुवर्ग केंद्रात चौथ्या वर्गापर्यंत शिक्षण दिले जाते. ऋषी व्हॅली एज्युकेशन सोसायटीच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेले शैक्षणिक साहित्य वापरले जाते. किमान २० मुलांसाठी केंद्र चालविले जाते. औपचारिक शाळेप्रमाणे हे केंद्र दररोज पाच तास चालते. शिक्षक स्थानिक समाजातूनच निवडला जातो. त्याची किमान पात्रता मॅट्रिक उत्तीर्ण अशी निर्धारित केली आहे. स्थानिक समिती, केंद्रासाठी जागा वा इमारत उपलब्ध करून देते. या केंद्रांना दीर्घ मुदतीच्या सुट्ट्या दिल्या जात नाहीत. शिक्षक ग्रामशिक्षण समितीच्या सहकार्याने स्थानिक गरजेनुसार शाळेच्या सुट्ट्या निश्चित करतो. शिक्षकास सुरुवातीस ३ दिवस आणि नंतर ५ दिवसाचे आवर्ती प्रशिक्षण दिले जाते. याशिवाय १० दिवस औपचारिक शाळेतील अध्यापनाचा अनुभव दिला जातो.

**आर्थिक तरतूद : (एका वर्षासाठी ) :**

| अ. क्र. | खर्चाची बाब | रक्कम (रु.) |
| --- | --- | --- |
| १. | शिक्षकाचे मानधन रु. २००० दरमहा | २४,०००.०० |
| २. | मुलांसाठी शैक्षणिक साहित्य रु. १०० प्रमाणे | २,५००.०० |
| ३. | शिक्षकांसाठी शैक्षणिक साहित्य | २,०००.०० |
| ४. | अध्यापन-अध्ययन साहित्य अनुदान | ५००.०० |
| ५. | शाळा सुधार अनुदान | २,०००.०० |
| ६. | निदेशकाचे प्रशिक्षण | १,०००.०० |
| ७. | ग्रंथालय | १,०००.०० |
| | **एकूण** | **३३,०००.००** |

**उत्तर प्रदेश (बहुवर्ग शाळा ) :**

**पार्श्वभूमी :** उत्तर प्रदेश राज्यातील सोनेभद्र आणि लक्ष्मीपूर खेरी जिल्ह्यातील दुर्गम भागातील वस्त्यांमधील किमान २५ ते ३० मुलांसाठी बहुवर्ग शाळा सुरू करण्यात आल्या. या शाळा Rishi Valley Education Society मॉडेलवर संरचित आहेत. जानेवारी १९९९ मध्ये या दोन जिल्ह्यांमध्ये ५९ बहुवर्ग शाळा सुरू करण्यात आल्या असून त्याचा लाभ ५५१ मुले व ५४८ मुलींना मिळत आहे. यांपैकी १२५ मुले आदिवासी समाजातील आहेत.

**स्वरूप :** ३०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या (आदिवासी क्षेत्राबाबत २५० पेक्षा कमी ) वस्त्यांमध्ये एक कि.मी. परिसरात शाळा नसल्यास किमान १५ मुलांसाठी बहुवर्ग शाळा सुरू करता येते. शाळा दररोज ४ तास, वर्षातून तीनशे दिवस चालते. केंद्रस्थानी असलेली औपचारिक शाळा नमुना शाळा म्हणून विकसित करण्यात आली असून या शाळेला १० बहुवर्ग शाळा जोडल्या आहेत. सध्या बहुवर्ग शाळांमध्ये इ. २रीपर्यंत शिक्षण दिले जाते. शिक्षकांची नेमणूक ग्रामशिक्षण समिती करते.

**इतर बाबी :**

- शिक्षकास सुरुवातीस १५ दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते.
- केंद्रस्थानची औपचारिक शाळा Rishi Valley धर्तीवर नमुना शाळा म्हणून विकसित केली जाते. या नमुना शाळेत बहुवर्ग शाळेतील शिक्षकांचे महिन्यातून एक दिवस केंद्र संमेलन आयोजित केले जाते.

**आर्थिक तरतूद : (एका वर्षासाठी ) :-**

| अ.क्र. | खर्चाची बाब | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १. | शिक्षकांचे मानधन रु. ६०० दरमहा | ७,२००.०० |
| २. | शाळेसाठी साहित्य (अनावर्ती) | २,४००.०० |
| ३. | लेखन साहित्य मुलामागे रु. २५ प्रमाणे | ६२५.०० |
| ४. | सादिलवार खर्च | २,०००.०० |
| ५. | शिक्षकाचे सुरुवातीचे प्रशिक्षण | २,०७०.०० |
| ६. | बहुवर्ग अध्ययन साहित्यपेटी | ३,०००.०० |
| | **एकूण** | **१७,२९५.००** |

**पश्चिम बंगाल (शिशू शिक्षा केंद्र )**

**पार्श्वभूमी :** पश्चिम बंगाल राज्यातील अनेक वस्त्यांमध्ये १ कि.मी.च्या परिसरात शाळा नाहीत. ज्या वस्त्यांमध्ये ५ ते ९ वयोगटातील किमान २० मुले शाळाबाह्य आहेत अशा मुलांसाठी पंचायत आणि ग्रामीण विकास विभागातर्फे शिशू-शिक्षा केंद्र चालविण्यात येतात. या राज्यात डी.पी.ई.पी. कार्यक्रम कार्यरत झाल्यापासून दोन्ही विभागाच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम चालू आहे. अहवाल वर्षात एकूण ९२२ शिशू शिक्षा केंद्रे कार्यरत असून तेथे ३३,८८० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**स्वरूप :** अशा वस्त्यांमध्ये किमान २० शाळाबाह्य मुले असलेल्या वस्त्यांतील ग्रामस्थ शिशू शिक्षा केंद्रासाठी ग्रामपंचायतीकडे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवितात. केंद्र दररोज ३ तास वर्षातून २०० दिवस चालते. केंद्राच्या वेळा व सुट्ट्या याबाबत स्थानिक व्यवस्थापन समिती निर्णय घेते. ४० वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या शिक्षिकेची नेमणूक या केंद्रासाठी केली जाते. तिला सहायिका संबोधले जाते. सहायिका स्थानिक किंवा जवळच्या परिसरातील असते. 'अपंगत्व' असे असलेला पुरुष उमेदवार शिक्षक म्हणून नेमता येतो. शिक्षिकेची किमान पात्रता इ. १२वी उत्तीर्ण निर्धारित केली असून आदिवासी आणि मागासवर्गीय भागात ती शिथिलक्षम आहे. संपूर्ण साक्षरता अभियान कार्यक्रमातील स्वयंसेवकास नेमणुकीत प्राधान्य दिले जाते. शिक्षिकेस सुरुवातीस ५ दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते. २० शिशू शिक्षा केंद्रासाठी एक शैक्षणिक पर्यवेक्षक नेमण्याची तरतूद आहे. तसेच एका केंद्रासाठी फर्निचर, फळा व शैक्षणिक साहित्य याकरिता रु. ५,०००/- अशी तरतूद आहे.

**आर्थिक तरतूद ( एक वर्षासाठी ) :**

| अ. क्र. | खर्चाची बाब | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १. | मासिक रु. १००० दराने दोन सहायिकांचे मानधन | २४,०००.०० |
| २. | अंतर्गत सुविधा | २,०००.०० |
| ३. | अध्यापन-अध्ययन साहित्य अनुदान | ५००.०० |
| ४. | प्रशासकीय खर्च | ५००.०० |
| | **एकूण** | **२७,०००.००** |

**राजस्थान (शिक्षा स्वयंसेवी शाळा ) :**

**पार्श्वभूमी :** या राज्यातील वाळवंटी भागात १५-२०' कुटुंबाच्या समूहाने वस्त्या विखुरलेल्या आहेत. शेती किंवा जलस्त्रोताजवळील अशा वस्त्यांना धानीज (dhanis) संबोधले जाते. अशा वस्त्यांत औपचारिक शाळा सुरू करणे व्यवहार्य नसल्यामुळे 'शिक्षा स्वयंसेवी शाळा' सुरू केल्या जातात.

**स्वरूप :** 'शिक्षा स्वयंसेवी शाळा' ही ६ तास चालणारी शाळा असून शाळांच्या वेळा ग्रामशिक्षण समिती निश्चित करते. शाळेत औपचारिक शाळेचा अभ्यासक्रम असून या शाळेसाठी तात्पुरते शेड बांधण्याची तरतूद आहे. या बांधकामासाठी डी.पी.ई.पी. ५० टक्के वाटा उचलते. आदिवासी भागातील शाळेसाठी डी.पी.ई.पी. चा वाटा ८० टक्के असतो उर्वरित वाटा स्थानिक समाजातून होतो.

शिक्षकांसाठी किमान पात्रता इ. १२वी उत्तीर्ण असून अनु.जात /जमात व अल्पसंख्याक स्थानिक उमेदवारास प्राधान्य दिले जाते. महिला उमेदवारासाठी शैक्षणिक पात्रता इ. ८वी उत्तीर्ण शिथिलक्षम आहे. शिक्षकांसाठी सुरुवातीचे प्रशिक्षण ४० दिवसांचे असून दुसऱ्या टप्प्यात हिवाळी सुट्टीच्या कालावधीत १० दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते. नंतरच्या प्रत्येक वर्षात १५ दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते.

शिक्षा स्वयंसेवी शाळा व्यवस्थापनाची जबाबदारी स्थानिक ग्रामशिक्षण समितीकडे असते.

**आर्थिक तरतूद (एका वर्षासाठी ) :**

| अ.क्र. | खर्चाची बाब | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १. | मानधन रु. १३५० दरमहा | १६,२००.०० |
| २. | अनावर्ती खर्च | ५००.०० |
| ३. | सादिलवार खर्च | १,०००.०० |
| ४. | प्रशिक्षण (शिक्षक) | ४,९४०.०० |
| ५. | अध्यापन-अध्ययन साहित्य अनुदान | ५००.०० |
| ६. | गट संमेलन | ३००.०० |
| ७. | भेटी अ) जिल्हाअंतर्गत (२ दिवस) | ४००.०० |
| | ब) जिल्हाबाहेर (३ दिवस) | ६००.०० |
| | क) राज्याबाहेर (६ दिवस) | ४,०००.०० |
| | **एकूण** | **२८,४९०.००** |

**स्थलांतरित कुटुंबातील मुलांसाठी पर्यायी शिक्षण योजना**

**गुजरात (सुट्टीतील अभ्यासक्रम ) :**

**पार्श्वभूमी :-** गुजरात राज्यातील डांग जिल्ह्यामधील अनेक कुटुंबे ऊसतोड कामासाठी दरवर्षी सप्टेंबर ते एप्रिल या कालावधीत गुजरात आणि महाराष्ट्रातील साखर कारखान्यांकडे स्थलांतर करतात. पालकासमवेत मुलेही स्थलांतर करत असल्याने या मुलांची शाळेतून तात्पुरती गळती होते व त्यांच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होतो. अशी मुले आपल्या स्वगावी परत आल्यानंतर उन्हाळ्याच्या सुट्टीत ६० दिवसांचे संक्षिप्त अभ्यासक्रम केंद्र सुरू करण्यात येते. स्थानिक शिक्षकाकडेच हे काम दिले जाते. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी औपचारिक शिक्षण प्रवाहात आपले शिक्षण चालू ठेवतात.

**स्वरूप :** हा संक्षिप्त अभ्यासक्रम सन १९९८-९९ वर्षात पथदर्शी म्हणून सुरुवातीला १० केंद्रांतून १०० मुलांसाठी सुरू करण्यात आला. संक्षिप्त अभ्यासक्रम केंद्र किमान ५ ते १० मुलांसाठीदेखील सुरू करण्यात येतो. केंद्राचे कामकाज दररोज ३ तास चालते. स्थानिक प्रशिक्षित पदवीधर या केंद्रात शिक्षक म्हणून काम करतात. शिक्षकास एका मुलामागे दरमहा रु. ५०/- मानधन दिले जाते. या शिक्षकांना ३० दिवसांचे विशेष प्रशिक्षण देण्यासाठी गुजरात एस.सी.ई.आर.टी.ने अभ्यासक्रम तयार केला आहे.

**आर्थिक तरतूद ( एक वर्षासाठी ) :**

| अ.क्र. | खर्चाची बाब | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १. | शिक्षकांचे मानधन | ४,०००.०० |
| २. | सादिलवार खर्च | ५००.०० |
| ३. | तज्ज्ञांचा प्रवास /दैनिक भत्ता | ५,०००.०० |
| ४. | प्रशिक्षण | ५,०००.०० |
| ५. | प्रशिक्षण घटक संच / प्रश्नपत्रिका / अभ्यासक्रम छपाई | ५,०००.०० |
| | **एकूण** | **१९,५००.००** |

## बालकामगार मुलांसाठी पर्यायी शिक्षण योजना

## आंध्र प्रदेश : एम. व्यंकटारंगेय्या फाऊंडेशन यांचा उपक्रम

**संकल्पना :** भारतामध्ये सुमारे १७ ते १८ दशलक्ष बाल कामगार आहेत. दारिद्र्यामुळे कुटुंबाच्या उदरनिर्वाहाला मदत व्हावी म्हणून पालक आपल्या पाल्यांना बाल कामगार म्हणून राबवितात असा सर्वसाधारण समज आहे. संशोधनअंती एम. व्ही. फाऊंडेशनला असे आढळून आले की, बाल कामगार होण्यासाठी दारिद्र्य हे काही प्रमुख कारण नाही. आणि पालक आपल्या मुलांना शाळेस पाठविण्यास मनापासून इच्छुक असतात.

**ब्रिज कोर्स** : उपरोक्त भूमिकेवर आधारित एम. व्ही. फाऊंडेशनचे कार्य पुढील उद्दिष्टांवर आधारित आहे :-

१. बालकामगार प्रथेचे निर्मूलन झाले पाहिजे.
२. सर्व मुले शाळेमध्ये दाखल झाली पाहिजेत.
३. शाळाबाह्य मुले ही बालकामगार आहेत किंवा नजीकच्या भविष्यात बाल-कामगार होण्याची क्षमता त्यांच्यात विकसित होत असते.

सन १९९१ मध्ये रंगारेड्डी जिल्ह्याच्या शंकरपल्ली मंडल अंतर्गत १६ मुलींना बाल-कामगार मुक्त करून एम. व्ही. फाऊंडेशनने आपल्या कार्याची सुरुवात केली. सन १९९१ पासून आतापर्यंत ३६ कॅम्प/ब्रिज कोर्स संपन्न झाले असून ७,५०० मुलांचा त्यात सहभाग होता. या मुलांमध्ये ग्रामीण भागातील ९० टक्के बालकामगार असून शहरी भागातील झोपडपट्टीमधील १० टक्के बालकामगार आहेत.

**कार्यपद्धती :** फाऊंडेशनचे काम यशस्वी व परिणामकारक होण्यासाठी बालकामगारांचे ३ वयोगट पाडण्यात आलेले आहेत.

- वयोगट ५ ते ८ वर्षे.
- वयोगट ९ ते ११ वर्षे.
- वयोगट १२ ते १४ वर्षे.

प्रत्येक वयोगटातील मुलांसाठी भिन्न कार्यपद्धती वापरली जाते.

अ) ५ ते ८ वयोगटातील मुलांना बालकामगार व्यवस्थेमधून मुक्त करून स्थानिक शासकीय शाळांमध्ये प्रवेश देणे.

ब) ९ ते ११ वयोगटातील मुलांना बाल कामगार व्यवस्थेमधून मुक्त करून शाळेमध्ये प्रवेश देणे. पालकांची मनोवृत्ती बदलणे. आणि ब्रिज कोर्स/उन्हाळी कॅम्पच्या माध्यमातून ही मुले आणि शाळेत जाणार मुले ह्यांच्यातील शैक्षणिक दरी भरून काढणे.

क) १२ ते १४ वयोगटातील मुलामुलींना १८ महिन्यांच्या दीर्घ निवासी कॅम्पमध्ये प्रवेश देणे आणि इ. ७वी उत्तीर्ण करून औपचारिक माध्यमिक शाळेमध्ये प्रवेश घेण्यास प्रवृत्त करणे.

**समाजाचा सहभाग :** एम. व्ही. फाऊंडेशनने समाज प्रबलीकरणाच्या माध्यमातून आपले कार्य यशस्वी केले आहे. पालक शिक्षक संघ, ग्रामशिक्षण समिती, मंडल शिक्षण समिती, युवा कार्यकर्ते यांच्या माध्यमातून बालकामगार मुक्त होऊन औपचारिक शिक्षणाच्या प्रवाहात योग्यवेळी सामील होतात.

**महाराष्ट्र : प्रोपेल प्रकल्प**

थोर शिक्षण तज्ज्ञ डॉ. जे. पी. नाईक यांनी १९७९ मध्ये प्रोपेल नावाचा एक अंशकालीन आणि अनौपचारिक प्राथमिक शिक्षणाचा प्रकल्प सुरू केला. समाजाच्या सहकार्यातून "सर्वांसाठी शिक्षण" यावरील एक कृतिसंशोधन म्हणजेच ही योजना होय.

***पहिल्या टप्प्यात :*** सन १९७९ ते १९८५ मध्ये पुणे जिल्ह्यातील ११० गावामधून ९ ते १४ वयोगटातील ४,३३२ मुलांमुलींची या प्रकल्पासाठी निवड करण्यात आली. यामध्ये ५० टक्के मुले ही शाळेत कधीच गेली नव्हती. व उर्वरित ५० टक्के मुले शाळेतून गळलेली होती.

***दुसऱ्या टप्प्यात :*** सन १९८५ ते १९८८ मध्ये प्रकल्पात नवीन ३५ गावातील अनौपचारिक शिक्षण केंद्रांमधील ६६९ मुलांचा समावेश करण्यात आला.

***तिसऱ्या टप्प्यात :*** सन १९८९ नंतर ५,५०० शाळाबाह्य मुलांना १७८ अनौपचारिक शिक्षण केंद्रांतून, अध्ययन शिबिरांतून प्राथमिक शिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**धार्मिक शिक्षण घेणाऱ्या शाळाबाह्य मुलांसाठी पर्यायी शिक्षण योजना**

**पार्श्वभूमी :** मकतब आणि मदरसामध्ये धार्मिक शिक्षण घेणारी मुस्लिम समाजातील बहुसंख्य मुले-मुली औपचारिक शाळांमध्ये प्रवेश घेत नाहीत. विशेषतः मुलींची पटनोंदणी औपचारिक शाळांमध्ये खूपच कमी असल्याचे निदर्शनास येते. जनाब आणि मौलवींना प्रशिक्षण देऊन मकतब आणि मदरसामधील अभ्यासक्रमाचे औपचारिक शिक्षण अभ्यासक्रमाद्वारे सबलीकरण करण्याचे प्रयत्न काही राज्यांमधे चालू आहेत.

**आसाम (मकतब) :** वयाच्या तिसऱ्या वर्षापासून मुलांना धार्मिक शिक्षण दिले जाते. त्यामुळे बहुसंख्य मुले-मुली औपचारिक शिक्षण प्रवाहाच्या बाहेर राहतात. मकतब येथे भेटी देऊन ह्या शाळाबाह्य मुलांना औपचारिक शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी जानेवारी १९९६ पासून राज्यात कार्यक्रम हाती घेण्यात आला. १२० मकतबमधील १०,००० पेक्षा अधिक मुलांना या कार्यक्रमाचा लाभ देण्यात आला. एकूण २५ विद्यार्थ्यांपैकी १५ मुली असणाऱ्या मकतबमध्ये धार्मिक शिक्षणासाठी लागणाऱ्या वेळाव्यतिरिक्त औपचारिक शिक्षणासाठी दररोज जादा तीन तास देण्यात आले. त्यासाठी जनाब यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात आले.

या कार्यक्रमांतर्गत जनाबची शैक्षणिक पात्रता किमान १०वी उत्तीर्ण ठरविण्यात आली आणि त्यांना दरमहा रु. ५०० मानधन देण्यात येते. इयत्ता १०वी उत्तीर्ण नसलेल्या निदेशकास (जनाब) यांना दरमहा रु. २५० मानधन देण्यात येते. मकतबमधील विद्यार्थी संख्या ४० असून तेथील निदेशक (जनाब) इयत्ता १०वी उत्तीर्ण नसल्यास इयत्ता १०वी उत्तीर्ण असलेल्या एक पर्यायी शाळा कार्यकर्ता मकतबमध्ये नेमला जातो. मकतब व्यवस्थापन समितीची स्थापना केली जाते.

अशा १० मकतबसाठी पर्यवेक्षक म्हणून एका शिक्षा समन्वयकाची नेमणूक केली जाते. केंद्रास (मकतब) सुमारे रु. ५०० किमतीचे शैक्षणिक साहित्य पुरविले जाते.

**उत्तर प्रदेश (मकतब आणि मदरसा) :**
मौलवींना दररोज जादा तीन तास औपचारिक शिक्षण अभ्यासक्रम शिकवावे लागते. त्याकरिता त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण दिले जाते. विद्यार्थी-निदेशक गुणोत्तर १:२५ असे आहे. अहवाल वर्षात राज्यामध्ये १० मकतबमधील सुमारे २५० मुला-मुलींना या योजनेचा लाभ झाला आहे. राज्यात कार्यान्वित 'शिक्षाघर' योजनेच्या धर्तीवर मकतब आणि मदरसामधील मुलामुलींना शैक्षणिक साहित्य पुरविण्यात येते.

**मुलींसाठी विशेष पर्यायी शिक्षण योजना :**
**पार्श्वभूमी :** शाळाबाह्य मुलींच्या विशिष्ट समस्या लक्षात घेऊन काही राज्यांमध्ये मुलींसाठी विशेष पर्यायी शिक्षण योजना कार्यान्वित आहेत.

**बिहार (अंगना विद्यालय) :** राज्यातील डोंगराळ, घनदाट अरण्य असलेल्या आणि दुर्गम भागात सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून बहुसंख्य पालक आपल्या मुलींना शाळेत पाठवीत नाहीत. ग्रामीण भागामध्ये बालविवाहाचे प्रमाण अधिक असल्यामुळे बालविवाहित मुलींना शाळेत पाठविण्यास पालक उत्सुक नसतात. ९ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुली घरगुती कामात पालकांना मदत करतात आणि आर्थिक लाभ मिळण्यास पालकांना साहाय्य करतात. त्यामुळे पालक या मुलींना शाळेत पाठविण्यास उत्सुक नसतात. शाळाबाह्य किशोरींसाठी खास करून 'अंगना विद्यालय' योजना राज्यातील डी.पी.ई.पी. जिल्ह्यात नोव्हेंबर, १९९८ मध्ये सुरू करण्यात आली. अहवाल वर्षात ४६७ अंगना विद्यालयात १५,००० अधिक मुलींना प्रवेश देण्यात आला.

महिला सामख्या कार्यक्रमांतर्गत सुरू करण्यात आलेल्या 'जगजगी' केंद्राच्या धर्तीवर अंगना विद्यालय आधारित आहेत. केंद्रासाठी दोन वर्षाचा अभ्यासक्रम असून दररोज चार तास केंद्र चालविले जातात. मुलींच्या विशेष गरजा लक्षात घेता केंद्रासाठी खास अभ्यासक्रम विकसित करण्यात आला आहे. अंगना विद्यालयाची शिक्षिका किमान इयत्ता ८ वी उत्तीर्ण असते. तिला **सहेली** संबोधिले जाते. **माता समिती** मार्फत सहेलीची निवड होते. त्याच समाजातील उमेदवारास प्राधान्य दिले जाते. सहेलीस दरमहा रु. ४०० मानधन मिळते. सहेलीस ३० दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण दिले जाते. दर तीन महिन्यांनी आवर्ती प्रशिक्षण दिले जाते. शिवाय प्रतिवर्षी १० दिवसांचे उद्‌बोधन केले जाते. सर्व प्रकारचे प्रशिक्षण निवासी स्वरूपाचे असते.

राज्यामध्ये **अपना विद्यालय** यासाठी विकसित करण्यात आलेली खास पुस्तके अंगना विद्यालयासाठी वापरली जातात. अंगना विद्यालयासाठी माता समितीस पहिल्या वर्षी रु. १,८५० तरतूद उपलब्ध केली जाते. मात्र दुसऱ्या वर्षापासून वार्षिक खर्चाची तरतूद रु. ५०० एवढी उपलब्ध केली जाते.

**उत्तर प्रदेश (प्रेहर पाठशाला) :** शाळेत अजिबात न गेलेल्या किंवा शाळेतून गळती झालेल्या ९ ते १४ वयोगटातील मुलींसाठी प्रेहर पाठशाला योजना सुरू करण्यात आली आहे. अहवाल वर्षात ५०६ मुलींसाठी ५८ प्रेहर पाठशाला प्रस्थापित करण्यात आल्या आहेत. मुलींना शिक्षण देण्यासोबतच स्थानिक हस्तकलेचे प्रशिक्षण प्रेहर पाठशालात देण्यात येते. प्रेहर पाठशाला सुरू करण्यासाठी किमान १५ मुली आवश्यक असून विशिष्ट हस्तकला शिकण्यासाठी किमान ५ मुली असणे आवश्यक असते.

प्रेहर पाठशाला दररोज चार तास चालते. त्यापैकी तीन तास शिक्षिका अध्यापनाचे काम करते. स्थानिक साधन व्यक्तीस स्थानिक हस्तकला शिकविण्यासाठी दररोज एक तास दिला जातो. केंद्रासाठी वार्षिक आर्थिक तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | खर्चाची बाब | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १. | शिक्षिकेचे मानधन (दरमहा रु. ६००/- प्रमाणे) | ७,२०० |
| २. | हस्तकला शिक्षकांचे मानधन (तीन शिक्षक - प्रत्येकी रु. १००/- दरमहा) | ३,६०० |
| ३. | अध्यापन-अध्ययन साहित्य व हस्तकला अध्ययन साहित्य | ३,००० |
| ४. | स्टेशनरी (१५ मुली X रु. ११०/-) | १,६५० |
| ५. | सादील | २,००० |
| | एकूण | १७,४५० |

## साखर शाळा (Sugar Schools)

### पार्श्वभूमी :-

नोव्हेंबर ते एप्रिल या कालावधीत ऊसतोडीच्या कामासाठी प्रकल्प जिल्ह्यातून (विशेषत: बीड, जालना, धुळे) मोठ्या प्रमाणात स्थलांतरण होते. पालकांसमवेत त्यांची मुलेही स्थलांतर करतात. अशा मुलांसाठी कारखान्याच्या परिसरात, कारखान्याच्या सहकार्याने सहा महिन्यांसाठी साखर शाळा चालविल्या जातात.

### उद्दिष्टे :

- ऊसतोडीसाठी पालकांसमवेत स्थलांतर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करणे.
- साखर कारखाना परिसरात हंगामी पूर्ण वेळ शाळा सुरू करणे.
- विद्यार्थ्यांची मूळ शाळेतून गळती होऊ नये म्हणून उपाययोजना करणे.
- स्थलांतरामुळे विद्यार्थ्यांच्या संपादणूक पातळीत होणारी घसरण भरून काढणे.

### स्वरूप :

- साखर शाळा ही पूर्ण वेळ शाळा असते.
- मूळ शाळेचा दाखला घेऊन स्थलांतरित विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.
- साखर हंगाम संपल्यानंतर विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी अहवाल व दाखला विद्यार्थ्यांसमवेत मूळ शाळेकडे पाठविला जातो.
- साखर शाळेत शिक्षक जिल्हा परिषदेकडून प्रतिनियुक्तीने दिला जातो.
- औपचारिक शाळेचा अभ्यासक्रम शिकविला जातो.
- साखर शाळेसाठी जागा साखर कारखान्याकडून मिळविली जाते.
- शिक्षकास त्याचे नियमित वेतन मिळते.
- विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य पुरवठा केला जातो.
- ४० विद्यार्थ्यांसाठी १ शिक्षक याप्रमाणे शिक्षक प्रतिनियुक्त केले जातात.
- साखर शाळा इ. १ली ते ५वी साठी चालविली जाते.

### पर्यवेक्षण व मार्गदर्शन :

- साखर कारखाना ज्या केंद्रांत समाविष्ट असेल त्या केंद्र प्रमुखांच्या नियंत्रणाखाली सदर साखर शाळा चालते.
- विद्यार्थ्यांची चाचणी केंद्र प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येते.
- गटशिक्षणाधिकारी यांची साखर शाळेस पंधरवड्यास एक भेट अपेक्षित असते.
- साखर कारखान्याकडून विद्यार्थ्यांना मोफत गणवेश मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो.
- पर्यायी शिक्षण साखर शाळेस पुरविला जातो.

## वीटभट्टी शाळा (Brick Kiln School)

### पार्श्वभूमी :-

राज्यातील नांदेड आणि ठाणे जिल्ह्यात वीटभट्टीवर काम करणारे मजूर कामासाठी स्थलांतरण करतात. पावसाळा संपल्यानंतर नोव्हेंबर ते मे वीटभट्टीचे काम चालते.

मोठ्या वीटभट्ट्या गावाच्या बाहेर, पाण्याची सोय आणि माती उपलब्ध असलेल्या ठिकाणी, मोठ्या शहरालगत लावल्या जातात. वीटभट्ट्यांवर मोठ्या संख्येने मजूर त्यांच्या मुलांसह स्थलांतरण करतात. अशा मुलांसाठी वीटभट्टी शाळा सुरू करण्यात आल्या आहेत.

### उद्दिष्टे :

- वीटभट्टी मजुरांच्या पाल्यासाठी शिक्षणाची सोय करणे.
- वीटभट्टी परिसरात हंगामी व पूर्णवेळ शाळा सुरू करणे.
- विद्यार्थ्यांची मूळ शाळेतून गळती होऊ नये म्हणून उपाययोजना करणे.
- स्थलांतरामुळे विद्यार्थ्यांच्या संपादणूक पातळीत होणारी घसरण भरून काढणे.

### स्वरूप :

- वीटभट्टी शाळा हंगामी स्वरूपाची असते.
- वीटभट्टी शाळा औपचारिक शाळेनुसार पूर्णवेळ चालते.
- मूळ शाळेचा दाखला घेऊन स्थलांतरित विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.
- वीटभट्टी शाळेवर ४० विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षक प्रतिनियुक्तीने जिल्हा परिषदेकडून दिला जातो.
- औपचारिक शाळेचा अभ्यासक्रम शिकविला जातो.
- वीटभट्टी शाळेसाठी जागा वीटभट्टी मालकाच्या सहकार्यातून मिळविली जाते.
- शाळेत इ. १ली ते ५वी चे वर्ग चालतात.
- पर्यायी शिक्षण किट वीटभट्टी शाळेस पुरविली जाते.

### पर्यवेक्षण व मार्गदर्शन :

- वीटभट्टी ज्या केंद्रात समाविष्ट असेल त्या केंद्र प्रमुखाच्या नियंत्रणाखाली वीटभट्टी शाळा चालते.
- विद्यार्थ्यांची चाचणी केंद्र प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली घेतली जाते.
- गटशिक्षणाधिकारी यांची वीटभट्टी शाळेस पंधरवड्यातून एकदा भेट अपेक्षित असते.
- वीटभट्टी मालकाकडून विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व शैक्षणिक साहित्य मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो.

### उपचारात्मक अध्यापनाचे वर्ग :-

* **डीपीईपी, औरंगाबाद** :- दि. १-११-२००० ते ३०-१२-२००० (६० दिवस) या कालावधीत १,४४२ शाळा ठिकाणी ते वर्ग संपन्न झाले असून लाभार्थी विद्यार्थी संख्या ३६,०५० एवढी आहे.

* **डीपीईपी, परभणी** :- परभणी शहरात कत्तलखान्यातील बालकामगारांसाठी ३ वर्ग कार्यान्वित आहेत. लाभार्थी संख्या :- मुले - ६०, मुली - ९२ , एकूण - १५२.

**समूह निवासी शाळा (Group Residential School)**

**पार्श्वभूमी :-** विखुरलेल्या विरळ वस्तीतील मुलांसाठी समूह निवासी शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. गडचिरोली जिल्ह्यात दूरवर पसरलेल्या विरळ वस्तीत अत्यंत कमी संख्येने असलेल्या मुलांसाठी मध्यवर्ती ठिकाणी समूह निवासी शाळा सुरू झाल्या आहेत.

**उद्दिष्टे :-**

- करार शाळा सुरू करता न येणा-या शाळाविरहित वस्त्या येथील ६ ते ११ वर्ष वयोगटातील मुला-मुलींसाठी शिक्षणाची सोय करणे.
- १०० टक्के पटनोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण होण्यास हातभार लावणे.
- १४ वर्ष वयापर्यंत मुलां-मुलींना शिक्षण प्रवाहात टिकवून धरणे.

**स्वरूप :**

- ज्या शाळाविरहित वस्तीमध्ये नवीन शाळा सुरू करता येत नाही किंवा करार शाळा देखील सुरू करता येत नाही अशा वस्तीतील मुलांना समूह निवासी शाळेत प्रवेश दिला जातो.
- समूह निवासी शाळा ही निवासी स्वरूपाची आहे.
- शाळेत प्रविष्ट मुले/मुली आदिवासी किंवा बिगर आदिवासी आहेत.
- ही शाळा औपचारिक शाळेप्रमाणे पूर्णवेळ चालते.
- शाळेची विद्यार्थी क्षमता ही ६० असून एका शाळेत तीन शिक्षक, दोन स्वयंपाकी मान्य आहेत.

शालेय इमारतीसाठी प्रत्येकी रु. १४ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. इमारतीत वर्ग खोल्या व डार्मेटरिजचा समावेश आहे.

**हंगामी वसतिगृह :- (Seasonal Hostel)**

**पार्श्वभूमी :** स्थलांतर रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना म्हणून स्थलांतरित कामगारांच्या विद्यार्थी मुला-मुलींसाठी निवासाची व जेवणाची सोय करून शिक्षण मिळवून देणे व पालकांच्या स्थलांतरित काळात नियमित प्राथमिक शाळेत शिक्षणाच्या प्रवाहात खंड पडू नये यासाठी हंगामी वसतिगृह योजना आहे. पालकांबरोबर स्थलांतर करणाऱ्या मुलांच्या निवासाची गावातच सोय करण्यासाठी हंगामी वसतिगृहाची संकल्पना आहे.

**उद्दिष्टे :**

- स्थलांतरणामुळे प्राथमिक शिक्षणापासून वंचित रहाणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या ६-११ वयोगटातील मुला-मुलींसाठी शिक्षणाची सोय करणे.
- पालकांच्या स्थलांतरित कालावधीत त्यांच्या मुलांच्या शिक्षण व निवासाची सोय करणे.

**इमारत :** शासकीय शाळा किंवा विनाभाडे तत्त्वावर इमारत घेण्याची तरतूद आहे.

**कर्मचारी वृंद :** बदलीने वा प्रतिनियुक्तीने घेतला जातो.

**कार्यपद्धती :**

- दरवर्षी स्थलांतरित होणाऱ्या कुटुंबाचे सर्वेक्षण करणे.
- सूक्ष्म नियोजनातून लाभार्थी आणि इमारतीची उपलब्धता तपासणे.
- उपलब्धतेचे अधिक प्रमाण असलेल्या मध्यवर्ती ठिकाणी वसतिगृहयुक्त निवासी शाळा सुरू करणे.
- प्रतिनियुक्त कर्मचा-यांना आवश्यक प्रशिक्षण व मानधन देणे.

**केंद्रीय गट, कोअर ग्रूप (CORE GROUP) मार्फत बाल कामगारांचे शिक्षण एक उपक्रम**

**उद्दिष्टे :-**

- बाल कामगारांचे सर्वेक्षण करणे.
- बाल कामगार मुला-मुलींसाठी त्यांच्या सोयीनुसार शिक्षण देणे.
- शहरातील नागरिकांचे सहकार्य मिळविणे.
- स्थानिक शाळा मुख्याध्यापकाचे मदतीने, सहकार्याने बालकामगारांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करणे.
- अशा ८ ते १० मुख्याध्यापकांचा कोअर ग्रुप स्थापन करणे.

**स्वरूप :**

- कोअर ग्रुपचे सदस्य सदर वर्गाचे पर्यवेक्षण करतात. पालकांच्या भेटी घेतात आणि १००% विद्यार्थी उपस्थिती ठेवण्यासाठी प्रयत्न करतात.
- जिल्ह्यातील शहरी भागातील हॉटेल, औद्योगिक वसाहती आणि यांसारख्या ठिकाणी काम करणारे ९-१४ वयोगटातील शाळाबाह्य मुला-मुलींच्या पर्यायी शिक्षणासाठी कोअर ग्रुप मदत करतो .
- कोअर ग्रुपमध्ये सदर क्षेत्रातील ८-१० शाळांचे मुख्याध्यापक असतात. त्यापैकी एक अध्यक्ष व उर्वरित सर्व सदस्य असतात.
- प्रेरणा केंद्रातील बाल कामगार यांना कोअर ग्रुप साहित्य उपलब्ध करून देतो.
- पालकांच्या वेळोवेळी भेटी घेऊन जाणीव जागृती निर्माण करतो.
- सदर प्रेरणा केंद्रातील निदेशक पदी योग्य उमेदवाराची निवड करण्यासाठी कोअर ग्रुप शिफारस करतो.

- प्रेरणा केंद्रातील २ वर्षांचा अभ्यासक्रम समाधानकारकरीत्या पूर्ण केलेल्या बाल कामगारास त्यांच्या सोयीनुसार औपचारिक शाळेत इ. ५वी मध्ये प्रवेश देण्यासाठी कोअर ग्रुप प्रयत्नशील असतो.
- कोअर ग्रुपने चालविलेल्या प्रेरणा केंद्रांमधून भारतीय शिक्षण संस्था, कोथरुड, पुणे - २९ यांनी विकसित केलेला २ वर्षाचा (१२०० घड्याळी तासांचा ) अभ्यासक्रम शिकविला जातो.

## उन्हाळी सेतू अभ्यास शाळा (Summer Bridge Course School)

**पार्श्वभूमी :** मनुष्यबळ विकास मंत्रालय (प्राथमिक शिक्षण व साक्षरता विभाग) भारत सरकार, शास्त्री भवन, नवी दिल्ली - ११० ००१ यांच्या सूचनेवरून कर्नाटक राज्यात सुरू असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रम **'चिन्नारा- अंगाला'** प्रकल्पाच्या धर्तीवर धुळे या आदिवासी जिल्ह्यातील पूर्ण आदिवासी असलेल्या धडगाव गटामध्ये 'उन्हाळी सेतू अभ्यास शाळा प्रकल्प' प्रायोगिक तत्त्वावर महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्याचे निश्चित करण्यात आले.

**उद्दिष्टे :-**

- इ. २री ते ४थी मधून गळती झालेल्या मुलांमुलींना औपचारिक शिक्षण प्रवाहात आणणे.
- उन्हाळी सेतू अभ्यास शाळा प्रकल्पाच्या माध्यमातून अशा मुलांची मानसिकता विकसित करणे.
- सदर अभ्यासपूर्ण केल्यानंतर प्राप्त क्षमता लक्षात घेता आगामी शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यास औपचारिक शाळेत इ. ३री /४थी /५वी मध्ये प्रवेश देणे.
- १००% पटनोंदणीचे उद्दिष्टे पूर्ण होण्यास हातभार लावणे.
- १४ वर्ष वयापर्यंतच्या मुलामुलींना शिक्षण प्रवाहात टिकवून धरणे.

**सेतू शाळेचे स्वरूप : (धडगाव गट)**

१. शाळेचा कालावधी २९ एप्रिल ते १४ जून २००१ (४५ दिवस).
२. शाळा निवासी स्वरूपाची असून सकाळचा नाश्ता, दुपारचे व रात्रीचे भोजन मोफत पुरविले गेले.
३. ९ ते १४ वयोगटातील इ. २री ते ४थी मधून गळती झालेल्या मुलामुलींना अशा शाळेत प्रवेश देण्यात आला.
४. शाळेची प्रवेश क्षमता ३० विद्यार्थी होती.
५. धडगाव गटात एकूण १४ केंद्र असून केंद्र पातळीवर प्रत्येकी दोन सेतू शाळा (मुलामुलींसाठी स्वतंत्र) सुरू करण्यात आल्या.
६. अशा प्रकारे गटातील एकूण ४२० मुले आणि ४२० मुली यांना सदर प्रकल्पाचा लाभ मिळाला.
७. सेतू शाळासाठी प्रत्येकी एक निदेशक, एक स्वयंसेवक, एक शिबीर प्रमुख यांच्या नेमणुका करण्यात आल्या.

८. विद्यार्थ्यासाठी पूर्व चाचणी, उत्तर चाचणी, साहित्य पेटी आणि स्वयंअध्ययन पुस्तिका उपलब्ध करून देण्यात आल्या.
९. निदेशकांचे १० दिवसीय सेवापूर्व प्रशिक्षण घेण्यात आले.
१०. साहित्य निर्मिती, निदेशकाचे प्रशिक्षण इ. डायटमार्फत करण्यात आले.
११. स्थानिक समाजाचा सहभाग घेण्यात आला.
१२. जिल्हा सल्लागार समिती आणि गट सल्लागार समिती तसेच स्थानिक सनियंत्रण समित्या स्थापन करण्यात आल्या.
१३. विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.
१४. आठवड्यातून दोन पाहुणे व्याख्यानाचे आयोजन प्रत्येक सेतू शाळेत करण्यात आले होते.

**महात्मा फुले शिक्षण हमी योजनेअंतर्गत हंगामी स्थलांतरित**
**<u>मुलांसाठी प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करणेबाबत</u>**

**महाराष्ट्र शासन**
## शालेय शिक्षण विभाग
**शासन निर्णय क्रमांक:पीआरई-२००१/(२९०२)/प्राशि-१**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,**
**दिनांक : २३ एप्रिल २००२**

**वाचावे - (१) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक व्हीएलएस १०९६/(१९५/९६)/ प्राशि-३, दिनांक ३० ऑक्टोबर १९९६**
**(२) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक पीआरई २०००/२६०१/प्राशि-१, दिनांक १३ ऑक्टोबर २००० व दिनांक १५ मे २००१**
**(३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक पीआरई १०९९/२१७५/प्राशि-१ दिनांक २० मार्च २००१**

**<u>प्रस्तावना</u> :-** इ.स. २००० पर्यंत राज्यात प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याचे उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने तसेच प्राथमिक शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता उंचावण्यासाठी करावयाच्या उपाययोजना सुचविण्याकरिता शासनाने एका कार्यबल गटाची नियुक्ती केली होती. या कार्यबल गटाने सादर केलेल्या अहवालात ६ ते १४ वयोगटातील सर्व मुले प्राथमिक शिक्षण व्यवस्थेत दाखल व्हावीत, ती शाळेत टिकून राहावीत आणि त्यांनी किमान अध्ययन क्षमता संपदावी ही उद्दिष्टे विहित करण्यात आली आहेत. ही उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने कृतिकार्यक्रमात विविध उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

२. राज्यात स्थलांतरित कामगारांच्या मुलांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर आहे. स्थलांतरित मुलांमध्ये खालील प्रकार आढळून येतात :-

१) ऊसतोड कामगारांची मुले जी साधारणत: ६ ते ८ महिने पालकांबरोबर स्थलांतरित होतात.
२) लमाण, धनगर, केकाडी, इत्यादी समाजातील मुले पालकांच्या बरोबर पालकांच्या व्यवसाय धंद्यानिमित्त फिरत असतात.
३) वीटभट्टी कामगारांची मुले पालकांबरोबर स्थलांतरित होतात.
४) इमारत बांधकाम व अन्य बांधकाम करण्याकरिता स्थलांतरित होण्याऱ्या कामगारांची मुले पालकांबरोबर स्थलांतरित होतात.

वरील स्थलांतरित मुलांच्या प्रकारामध्ये ऊसतोड कामगारांच्या मुलांची संख्या जास्त आहे. त्यामुळे शासनाने वरील संदर्भ १ नुसार ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी प्राथमिक शाळा सुरू करण्याची योजना सुरू केली आहे. दरम्यानच्या काळात राज्यातील ज्या वाड्या, वस्त्यांवर प्रचलित निकषानुसार प्राथमिक शाळा सुरू करता येत नाही परंतु तेथे प्राथमिक शाळेची आवश्यकता आहे, अशा ठिकाणांसाठी वस्तीशाळा सुरू केल्या आहेत. बालकामगार व अन्य शाळाबाह्य मुलांसाठी महात्मा फुले शिक्षण हमी योजना सुरू केली आहे. तथापि

अद्यापही इमारत व अन्य बांधकामासाठी स्थलांतरित होणारे लमाण, धनगर, केकाडी समाजातील कामधंद्यानिमित्त स्थलांतरित होणारे वीटभट्टी कामगार अशा स्थलांतरित होणाऱ्या कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित असण्याची शक्यता आहे. यातील काही मुले वस्तीशाळा व महात्मा फुले शिक्षण हमी योजनेमध्ये समाविष्ट होण्याची शक्यता आहे.

दरम्यानच्या काळात केंद्र शासनाने "सर्व शिक्षा अभियान" कार्यक्रम कार्यान्वित केला आहे व या कार्यक्रमांचाच एक भाग म्हणून शिक्षण हमी योजना व पर्यायी व नाविन्यपूर्ण शिक्षण या योजना सुरू केल्या आहेत. केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे १५ ते २० मुलांसाठी सुरू करण्यात येणाऱ्या उपक्रमांकरिता केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त होऊ शकते. हे सूत्र विचारात घेऊन, राज्यातील स्थलांतरित कामगारांच्या मुलांसाठी कामाच्या ठिकाणी प्राथमिक शिक्षणाची सुविधा अनौपचारिक व नाविन्यपूर्ण शिक्षण पद्धतीनुसार कार्यान्वित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे.

## शासन निर्णय

केंद्र शासन पुरस्कृत पर्यायी व नाविन्यपूर्ण शिक्षण योजनेअंतर्गत हंगामी किंवा मोसमी स्थलांतरित होणाऱ्या कामगारांच्या मुलांसाठी प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक : पीआरई २०००/२६०१/प्राशि-१, दिनांक १३ ऑक्टोबर २००० व १५ मे २००१ चा विस्तार करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. विस्तारीत योजनेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| योजनेचे नाव | या योजनेचे नाव हंगामी स्थलांतरित होणाऱ्या कामगारांच्या मुलांसाठी महात्मा फुले शिक्षण हमी योजना असे राहील. |
| योजनेचे उद्दिष्ट | हंगामी किंवा मोसमी स्थलांतरित होणा-या कामगारांच्या ६ ते १४ वयोगटातील मुलांसाठी प्राथमिक शिक्षणाची सुविधा त्यांच्या पालकांच्या कामाच्या ठिकाणी उपलब्ध करून देणे. |
| लाभार्थी | हंगामी स्थलांतरित होणाऱ्या कामगारांची ६ ते १४ वयोगटातील मुले |
| योजनेची अंमलबजावणी कोण करू शकेल | योजनेची अंमलबजावणी संपूर्णपणे स्वयंसेवी संस्थेमार्फत केली जाईल. |
| योजनेचे स्वरूप : | (१) स्थलांतरित कामगारांच्या कामाच्या ठिकाणी किमान सहा महिन्यांसाठी अनौपचारिकरित्या शिक्षण देणारे केंद्र सुरू केले जाईल.<br>(२) प्रत्येक केंद्रात ६ ते १४ वयोगटातील किमान १५ मुले उपलब्ध असतील.<br>(३) प्रत्येक केंद्रामध्ये गरजेनुसार इयत्ता १ली ते ७वी पर्यंतच्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल.<br>(४) केंद्र चालविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. |
| केंद्राचा कालावधी | केंद्र किमान ६ महिने कालावधीसाठी चालेल. दररोज केंद्र किमान ४ तास सुरू राहील. अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या ठिकाणचे काम ४ महिनेपर्यंत कमी राहणार असेल तर, अशा ठिकाणी दिवसातून ६ तास शिक्षण दिले जाईल, जेणेकरून संबंधित वर्गाचा विहित अभ्यासक्रम पूर्ण केला जाईल.<br>केंद्र संबंधित शैक्षणिक वर्षात केव्हाही सुरू करता येईल. |

| | |
|---|---|
| अभ्यासक्रम | केंद्रामधून भारतीय शिक्षण संस्थेचा अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके वापरण्यात यावी. तसेच एखाद्या स्वयंसेवी संस्थेने स्वतःचा अभ्यासक्रम विकसित केल्यास त्यास महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची मान्यता देऊनच तो अमलात आणण्यात यावा. |
| केंद्र स्वयंसेवक | अध्यापन पदविका उत्तीर्ण उमेदवार प्राप्त झाल्यास, अशा उमेदवारास केंद्र स्वयंसेवक म्हणून प्राधान्याने नियुक्ती द्यावी तथापि असा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर, किमान १२वी उत्तीर्ण उमेदवार नियुक्त करणे आवश्यक राहील. केंद्र स्वयंसेवकाची निवड व नियुक्ती संबंधित स्वयंसेवी संस्था करील. तसेच त्यांना मानधन देण्याची जबाबदारी त्या संस्थेची राहील. |
| केंद्राचे ठिकाण | स्थलांतरित कामगारांच्या साहाय्याने सुरू असलेल्या कामाचे ठिकाण |
| केंद्र सुरू करावयाची कार्यपद्धती | १) ज्या ठिकाणी स्थलांतरित कामगार काम करीत आहेत व त्या ठिकाणी ते कामगार ६ महिन्यांपर्यंत राहणार आहेत, अशा ठिकाणी त्या स्थलांतरित कामगारांची त्यांच्याबरोबर असलेली ६ ते १४ वयोगटातील किमान १५ मुले प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी उपलब्ध होऊ शकतील, अशा ठिकाणी केंद्र सुरू करण्यासाठी पंजीकृत स्वयंसेवी संस्था अर्ज करू शकतील.<br>(२) केंद्र सुरू करावयाची मागणी ग्रामीण भागात शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद व शहरी भागात प्रशासन अधिकारी, नगरपालिका किंवा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका यांचेकडे विहित नमुन्यात करण्यात यावी. अर्जाचा नमुना शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी विहित केल्याप्रमाणे राहील.<br>(३) निकषानुसार पात्र संस्थांचे अर्ज महात्मा फुले शिक्षण हमी योजनेसाठी जिल्हा स्तरावर व महानगरपालिका/नगरपालिका स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या कार्यकारी समितीच्या मान्यतेनंतर महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकरिता मंजुरीसाठी पाठविण्यात येतात.<br>(४) महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच संबंधित स्वयंसेवी संस्थेने केंद्र सुरू करावयाचे आहे. |
| केंद्रांचे व्यवस्थापन व प्रशासन | केंद्राच्या व्यवस्थापनाची व प्रशासनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित स्वयंसेवी संस्थेची राहील. जिल्हा परिषदांचे शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, शासन किंवा शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे अन्यथा निर्दिष्ट करतील, असे अधिकारी/कर्मचारी सदर केंद्राची तपासणी करतील असे अधिकारी केलेल्या तपासणीच्या अनुषंगाने सदर केंद्र सुरू ठेवावयाचे किंवा नाही याची शिफारस करतील व या शिफारशीच्या अनुषंगाने संबंधित कार्यकारी समिती केंद्र पुढे सुरू ठेवावयाचे किंवा नाही याचा निर्णय घेईल. |
| केंद्रातील विद्यार्थी | संबंधित केंद्रामध्ये स्थलांतरित कामगारांच्या मुलांना विद्यार्थी म्हणून प्रवेश केल्यानंतर पूर्वीच्या शाळेचा दाखला विचारात घेऊन त्यापुढील वर्गासाठी अभ्यासक्रम पूर्ण करून घेण्यात यावा. तसेच ज्या वर्गामध्ये ते शिक्षण घेत आहेत, तसा दाखला असेल त्या वर्गामध्ये प्रवेश देण्यात यावा.<br>संबंधित विद्यार्थ्याकडे पूर्वीच्या शाळेचा दाखला नसेल, तर त्या विद्यार्थ्यांचे वय व संपादणूक (अभ्यास) विचारात घेऊन त्याला संबंधित वर्गात प्रवेश देण्यात यावा. (वयाच्या बाबतीत तो पाच वर्ष पूर्ण झाल्यानंतर इयत्ता १ली मध्ये शिक्षण घेत असता असे |

| | |
|---|---|
| | गृहीत धरण्यात यावे म्हणजेच सहा वर्ष वयाच्या मुलाला त्याची १ली ची संपादणूक पूर्ण असेल तर इ.२री मध्ये प्रवेश देता येईल) |
| नियमित शाळेत प्रवेश | अशा केंद्रामधून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना केंद्राच्या स्वयंसेवकाने दिलेल्या दाखल्याच्या आधारे नियमित शाळेत प्रवेश देण्यात यावा. |
| अनुदान | एका केंद्रासाठी वार्षिक रु.११,८०० एवढे अनुदान शासनाकडून / केंद्र शासनाकडून देय असेल तर अनुदानाचा तपशील पुढीलप्रमाणे :-<br>१) स्वयंसेवकाचे मानधन, दरमहा रु.१५००/- प्रमाणे सहा महिन्यासाठी रु.९०००/-<br>२) पाठ्यपुस्तके : (प्रति विद्यार्थी रु.४०/- याप्रमाणे २० विद्यार्थ्यांसाठी) रु. ८००/-<br>३) सादील खर्च रु.१०००/:<br>४) प्रशिक्षण : (आयोजित केल्यास) रु.१०००/-<br>या योजनेचा समावेश केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त होण्यासाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाच्या जिल्हानिहाय कृती आराखड्यामध्ये करण्यात यावा. |
| संकीर्ण अधिकारी | या योजनेच्या स्वरूपापेक्षा वेगळ्या प्रकारची एखादी योजना/केंद्र चालविण्यात येत असल्यास त्यास या योजनेखाली मान्यता देण्याचे अधिकार मा. शालेय शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या राज्यस्तरीय अनुदान समितीस राहील. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सही/-**

**( शा. पां. जोशी )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**
**शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.**
**संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.**
**राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.**
**महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.**
**महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.**
**आयुक्त आदिवासी विकास, नाशिक**
**सर्व विभागीय आयुक्त**
**आयुक्त, सर्व महानगरपालिका**
**सर्व जिल्हाधिकारी**
**साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद**
**सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक**
**सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद**
**सर्व प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, नगरपालिका/महानगरपालिका**
**ग्रामविकास विभाग/आदिवासी विकास विभाग/नगरविकास विभाग/सामाजिक न्याय विभाग/उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (५ प्रती) मंत्रालय, मुंबई**
**मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव**
**मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव**
**निवडनस्ती, प्राशि १**

**राज्यातील ६-१४ वयोगटातील बालकामगार आणि अन्य शाळाबाह्य मुलांचे शिक्षण महात्मा फुले शिक्षण हमी योजना सुरू करण्याबाबत सुधारणा**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पीआरई २००० (२६०१)/प्राशि-१)**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १५ मे २००१**

**वाचावे : शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.पीआरई २०००/(२६०१)/प्राशि-१, दिनांक १३ ऑक्टोबर २०००**

**शासन निर्णय :-** राज्यातील बालकामगार आणि अन्य शाळाबाह्य प्रत्येक मुलासाठी त्यांच्या सोयीच्या वेळी व सोयीच्या ठिकाणी प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने समक्रमांक दि. १३ ऑक्टोबर २००० च्या शासन निर्णयाद्वारे " महात्मा फुले शिक्षण हमी योजना " सुरू केली आहे. सदर योजनेच्या सुरळीत व परिणामकारक अंमलबजावणीच्या दृष्टीने या योजनेमध्ये काही सुधारणा/बदल करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्या दृष्टीने दि. १३ ऑक्टोबर २००० च्या शासन निर्णयात पुढे नमूद केल्याप्रमाणे सुधारणा /बदल करण्यात येत आहेत.

दि. १३ ऑक्टोबर २००० च्या शासन निर्णयातील परिच्छेद २(१) पुढीलप्रमाणे राहील :-

राज्यामध्ये बाह्यसाहाय्यीत जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम, आमची शाळा (आशा) प्रकल्प व प्राथमिक शिक्षण समृद्धी प्रकल्प कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या पर्यायी व नाविन्यपूर्ण शिक्षण योजनेच्या धर्तीवर जी केंद्रे सुरू असतील त्या केंद्रांना महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्रे असे संबोधण्यात यावे. ज्या ठिकाणी मुलांचे सर्वेक्षण झालेले असूनही अशी मुले सुरू असलेल्या केंद्रांमध्ये जात नसतील व शिक्षणापासून वंचित असतील तर त्या मुलांना अशा केंद्रामध्ये सामावून घेतले जावे. काही अडचणीमुळे अशी मुले केंद्रामध्ये सामावून घेणे शक्य नसेल तर आवश्यकतेनुसार नवीन केंद्र सुरू करण्यात यावे. ज्या ठिकाणी अद्याप सर्वेक्षण पूर्ण झालेले नाही किंवा सर्वेक्षण होऊनही काही वंचित मुलांची नावे सर्वेक्षणामध्ये आली नसतील तर अशा ठिकाणी सर्वेक्षण पूर्ण करण्यात यावे व वंचित मुलांच्या नावाची यादी सादर केल्यानंतर सदर यादीस मान्यता मिळताच त्या ठिकाणी केंद्र सुरू करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

परिच्छेद २ (२) मध्ये पुढील मुद्द्यांचा समावेश करण्यात येत आहे :-

(अ) महात्मा फुले शिक्षण हमी योजनेअंतर्गत शाळाबाह्य व शिक्षणापासून वंचित मुलांचे सर्वेक्षण करताना शाळाबाह्य अपंग मुलांचेही सर्वेक्षण करण्यात यावे व अपंग मुलांना प्राधान्याने या योजनेमध्ये समाविष्ट करण्याची दक्षता घेण्यात यावी.

(ब) दरवर्षी प्राथमिक शाळेत दाखल करण्यायोग्य वयाच्या मुलांचे सर्वेक्षण करण्यात येते. या सर्वेक्षणानुसार ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य मुलांचा आढावा शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद यांनी घ्यावा. बालकामगार व शाळाबाह्य मुलांच्या यादीला ग्रामशिक्षण समिती अथवा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शिक्षण समितीची मान्यता घेण्यात यावी. या योजनेअंतर्गत स्वयंसेवी संस्थांकडून सादर केलेल्या याद्या ग्रामशिक्षण समित्यांकडून मंजूर होऊन आल्या नसतील तर त्या याद्या योग्य असल्याबाबत स्वयंसेवी संस्थेकडून प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे.

(क) ६ ते १४ वयोगटातील कोणताही बालकामगार शिक्षणापासून वंचित राहणार नाही यादृष्टीने बिनधोकादायक उद्योगांच्या मालकांनी त्यांच्याकडे कामासाठी असलेल्या मुलांची संख्या व यादी कामगार उपायुक्त तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांना देणे बंधनकारक राहील. बिनधोकादायक उद्योगात एखादा मालक एकही बालकामगार ठेवीत असेल तर त्याच्यासाठी महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्राची मागणी जिल्हाधिकाऱ्याकडे करणे मालकावर बंधनकारक राहील. बालकामगार मुलाला शाळेत जाता येईल यासाठी त्याच्या कामाच्या वेळेत सोयीस्कर बदल करणे व केंद्रासाठी जागा उपलब्ध करून देणे ही जबाबदारी मालकाची राहील व याप्रमाणे कार्यवाही होते किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी कामगार उपायुक्तांची राहील.

परिच्छेद २(५) मध्ये पुढीलप्रमाणे समावेश राहील :-

प्रत्येक जिल्ह्यात सुरू करावयाच्या केंद्राबाबत स्वयंसेवी संस्थांकडून प्राप्त होणारे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (प्राथ.)/प्रशासन अधिकारी यांनी जिल्हा स्तरीय कार्यकारी समितीच्या मान्यतेनंतर राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करावे. विहित नमुन्यात अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३ महिन्यांच्या आत जिल्हा स्तरीय कार्यकारी समिती अर्जावर निर्णय देईल.

महात्मा फुले शिक्षण हमी योजनेअंतर्गत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांना ज्या इयत्तेच्या अभ्यासक्रमाची संपादणूक (अध्ययनक्षमता) प्राप्त केली आहे किंवा जी इयत्ता उत्तीर्ण झाल्याचा दाखला केंद्र स्वयंसेवकांनी दिला असेल तो दाखला त्याला नियमित शाळेत पुढील वर्गात प्रवेश देण्यासाठी ग्राह्य राहील.

परिच्छेद २(६) मध्ये पुढीलप्रमाणे समावेश करण्यात येत आहे : -

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी व महानगरपालिका क्षेत्रात आयुक्त जबाबदार राहतील. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद हे जिल्हा कार्यकारी समितीचे सदस्य-सचिव तसेच महात्मा फुले शिक्षण हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी राहतील.

महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी हे महानगरपालिका क्षेत्रासाठीच्या कार्यकारिणी समितीचे सदस्य सचिव व योजनेच्या अंमलबजावणीठी प्रमुख अधिकारी राहतील.

याशिवाय दि.१३ ऑक्टोबर २००० च्या शासन निर्णयाच्या परिशिष्ट "अ" मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

अ.क्र.४ :- योजनेचे उद्दिष्ट पुढीलप्रमाणे राहील :- सर्वेक्षणानुसार ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य मुलांच्या इ.१ली ते ४थी पर्यंतच्या समकक्ष शिक्षणाची सोय उपलब्ध करून अशा मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात

येण्याची संधी उपलब्ध करून देणे, तसेच मुलाचे वय व संपादणूक (अध्ययनक्षमता) लक्षात घेऊन ७वी पर्यंतच्या समकक्ष शिक्षणाची सोय करणे.

अ.क्र.५:- स्थानिक गरज लक्षात घेऊन स्वयंसेवी संस्थेने स्वतंत्र अभ्यासक्रम विकसित केल्यास त्यास महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची मान्यता घेऊनच तो केंद्रासाठी लागू करण्यात यावा.

अ.क्र.७:- केंद्र स्वयंसेवक केंद्रचालक म्हणून जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या स्थानिक शिक्षकांनाही अतिरिक्त जबाबदारी घेता येईल व त्यासाठी मंजूर असलेले मानधन घेण्यास ते पात्र राहतील.

शासन निर्णय दि. १३ ऑक्टोबर २००० च्या परिशिष्ट "ब" मध्ये नमूद करण्यात आलेल्या (१) जिल्हा परिषद सल्लागार समिती, (२) महानगरपालिका सल्लागार समिती, (३) नगरपालिका सल्लागार समिती, (४) कार्यकारी समिती यांचेवर प्रत्येकी एक अशासकीय सदस्य ( त्या भागात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचा प्रतिनिधी) नियुक्त करण्यात यावा.

वर नमूद केलेल्या सुधारणा / बदल खेरीज दि. १३ ऑक्टोबर २००० चा शासन निर्णय जसाच्या तसा लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

**( गो. दे. कोकणी )**

**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे

संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक

सर्व विभागीय आयुक्त

आयुक्त, सर्व महानगरपालिका

सर्व जिल्हाधिकारी

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सर्व जिल्हा परिषदा

ग्रामविकास विभाग, आदिवासी विकास विभाग, नगरविकास विभाग, समाजकल्याण विभाग मंत्रालय, मुंबई

सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव

मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव

मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक

शालेय शिक्षण विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई

निवडनस्ती - प्राशि-१

**राज्यात प्राथमिक शिक्षणासाठी**
**'वस्तीशाळा' योजना सुरू करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक : पीआरई १०९९/(२१७५)/प्राशि-१**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १८ एप्रिल २०००**

**पार्श्वभूमी :**

राज्यामध्ये प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपविण्यात आलेली आहे. काही ठिकाणी खाजगी संस्थांनाही प्राथमिक शाळा सुरू करण्यासाठी मान्यता देण्यात येते. प्राथमिक शाळा सुरू करण्यासाठी शासनाने विहित केलेल्या निकषानुसार सर्वसाधारपणे दीड कि.मी. परिसर व २०० लोकसंख्येसाठी प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध नसल्यास अशा ठिकाणी प्राथमिक शाळा सुरू करण्यात येते. आदिवासी, दुर्गम व डोंगराळ भागात १ कि.मी. परिसर व १०० लोकसंख्येसाठी प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. मात्र प्राथमिक शाळा सुरू करण्यासाठी जिल्हा नियोजन समित्यांनी आवश्यक ती तरतूद उपलब्ध करून देणे आवश्यक असते. वरील निकषानुसार शाळा सुरू करण्यात येत असल्या तरी हे निकष पूर्ण न करणाऱ्या अनेक वस्त्या, पाडे, तांडे आहेत जेथे प्राथमिक शाळेची आवश्यकता भासते. विशेषतः नद्या, नाले, डोंगराळ भाग, दुर्गमता इत्यादी नैसर्गिक अडचणींमुळे लहान विद्यार्थ्यांना जवळच्या अन्य गावातील किंवा वस्तीवरील प्राथमिक शाळेत जाणे अडचणीचे होते. अशा ठिकाणी प्राथमिक शिक्षणाची सुविधा कोणत्या न कोणत्या स्वरूपात उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते. शासनाने प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे व ते पूर्ण करण्यासाठी शाळेत जाण्यायोग्य वयाच्या सर्व मुलांना शाळेत दाखल करणे आवश्यक आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देणे ही शासनाची जबाबदारी आहे. या सर्व बाबींचा विचार करता प्राथमिक शाळांची पर्यायी सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक झाले आहे. मध्य प्रदेश शासनाने शिक्षण हमी योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीकडून शाळा सुरू करण्याची मागणी आल्यास ९० दिवसांत शाळा सुरू करण्याची हमी दिलेली आहे. या शाळा पूर्णपणे ग्रामपंचायतीमार्फत चालविल्या जातात. याच धर्तीवर आपल्या राज्यात पर्यायी योजना सुरू करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय**

प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विहित केलेल्या निकषांची पूर्तता न करणाऱ्या परंतु प्राथमिक शाळेची आवश्यकता असलेल्या राज्यातील वस्त्या, वाड्या, पाडे, तांडे अशा ठिकाणी प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने वस्तीशाळा सुरू करण्याच्या योजनेस शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. वस्तीशाळा योजनेचा तपशील सोबतच्या जोडपत्र - अ मध्ये दर्शविला आहे.

३. राज्यामध्ये कार्यान्वित असलेल्या 'जिल्हा प्राथमिक शिक्षण प्रकल्प' (डी.पी.ई.पी.), 'प्राथमिक शिक्षण समृद्धी कार्यक्रम' (पीप) व 'आमची शाळा' या प्रकल्पांतर्गत संबंधित जिल्ह्यामधून संबंधित प्रकल्पासाठी मंजूर असलेल्या निधीतून वस्तीशाळा सुरू करण्यात याव्यात.

४. या योजनेची अंमलबजावणी सन २००० पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून करण्यात यावी.

५. 'शाळा नसलेल्या खेड्यात नवीन शाळा सुरू करणे' या योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन समित्यांनी उपलब्ध करून दिलेल्या तरतुदीमधून ही योजना सुरू करण्यात यावी.

६. प्रत्येक आर्थिक वर्षात वस्तीशाळा सुरू करण्याचे प्रस्ताव संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी शिक्षण संचालकामार्फत शासनाकडे सादर करावेत. वस्तीशाळांसाठी शासनाने आवश्यक ती आर्थिक तरतूद उपलब्ध करून वस्तीशाळा मंजुरीचे आदेश निर्गमित केल्यानंतरच वस्तीशाळा सुरू करण्यात याव्यात.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६७७१/व्यय ५-अ, दिनांक ७ जानेवारी २००० अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सही/-**
**(रमेशचंद्र कानडे)**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
संचालक, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, पुणे
शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य , पुणे
प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, चर्नीरोड, मुंबई
संचालक, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद
संचालक, शासकीय परीक्षा मंडळ, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद
सर्व जिल्हाधिकारी
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळे
मुख्य अधिकारी, विदर्भ व मराठवाड्यातील सर्व नगरपालिका, नगरपरिषदा
सर्व शिक्षणाधिकारी, महानगरपालिका
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -२, नागपूर
महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई
महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, मुंबई
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा कोषाधिकारी
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, समाजकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, कार्यासन, प्राशि-१.

## शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक : पीआरई १०९९/(२१७५)/ प्राशि-१, दिनांक १८ एप्रिल २००० चे सहपत्र

### जोडपत्र -अ

१. **वस्तीशाळेचे स्वरूप**

(१) वस्तीशाळेचे स्वरूप अनौपचारिक राहील.

(२) वस्तीशाळा ही स्थानिक स्वराज्य संस्थांची किंवा शासनाची शाळा असणार नाही, तर ती स्थानिक लोकांची शाळा असेल.

(३) वस्तीशाळा इयत्ता १ली ते ४थी साठी राहील. ती पहिल्या वर्षी इयत्ता १ली साठी सुरू करण्यात यावी.

(४) पुढील प्रत्येक वर्षी आवश्यकेतनुसार इयत्ता २री, इयत्ता ३री, व इयत्ता ४थीचे वर्ग सुरू करण्यात यावेत.

२. **वस्तीशाळा सुरू करण्यासाठी निकष**

(१) ज्या ठिकाणी अर्धा कि.मी. परिसरात प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध नसेल अशाच ठिकाणी वस्तीशाळा सुरू करता येईल.

(२) प्रत्येक वस्तीशाळा किमान १५ (पंधरा) विद्यार्थ्यांसाठी असेल.

(३) वस्तीशाळा सुरू करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

३. **वस्तीशाळेची मागणी**

(१) संबंधित गावाच्या ग्रामपंचायतीने वस्तीशाळेची मागणी करावी.

(२) तथापि, ग्रामपंचायतीने काही कारणांमुळे वस्तीशाळेची मागणी केली नाही तर स्थानिक जनतेला एकत्र येऊन वस्तीशाळेची मागणी करता येईल.

(३) वस्तीशाळेची मागणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे करावी. मागणी अर्जात खालील मुद्द्यांवर माहिती द्यावी.

अर्जाची एक प्रत ग्रामपंचायतीने आपल्या दप्तरात ठेवावी.

अर्जातील मुद्दे :-

- शाळेत दाखल करावयाच्या मुला-मुलींची एकूण संख्या, प्रत्येकाची नावे व वय, पालकांची नावे.
- आजूबाजूच्या परिसरात प्राथमिक शिक्षणाची सुविधा किती अंतरावर आहे.
- सध्या वस्तीवरील मुले कोणत्या प्राथमिक शाळेत जात आहेत.
- प्राथमिक शिक्षक म्हणून विहित केलेली अर्हता (डी.एड. उत्तीर्ण किंवा किमान इयत्ता १२वी उत्तीर्ण ) प्राप्त केलेले किती उमेदवार शिक्षकाचे काम करण्यासाठी उपलब्ध आहेत.

त्यांची नावे व शैक्षणिक अर्हता आणि डी.एड. व इयत्ता १२वीच्या परीक्षेत मिळविलेले गुण.

**४. वस्तीशाळेचे प्रशासन**

वस्तीशाळा चालविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित गावाच्या ग्रामपंचायतीची राहील. वस्तीशाळेचे संपूर्ण प्रशासन ग्रामपंचायतीने सांभाळावयाचे आहे. वस्तीशाळेसाठी विहित केलेल्या अर्हतेच्या शिक्षकांची नियुक्तीही ग्रामपंचायतीनेच करावयाची आहे.

**५. वस्तीशाळा सुरू करण्याची कार्यपद्धती**

(१) वस्तीशाळा सुरू करण्यासाठी संबंधित गावाच्या ग्रामपंचायतीने आवश्यक त्या तपशीलासह जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे ऑक्टोबर अखेरपर्यंत लेखी स्वरूपात मागणी करावी.

(२) मागणी आल्यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी मागणी केलेल्या ठिकाणी वस्तीशाळेची आवश्यकता आहे किंवा कसे हे निश्चित करावे.

(३) वस्तीशाळेच्या आवश्यकतेबाबतचा निर्णय एक महिन्यात घेण्यात यावा व वस्तीशाळेची आवश्यकता नसल्यास संबंधित ग्रामपंचायतीला तसे त्वरित कळविण्यात यावे.

(४) ऑक्टोबर अखेरपर्यंत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीकडून आलेली मागणी विचारात घेऊन वस्तीशाळा सुरू करण्याकरिता आवश्यक त्या तरतुदीची जिल्हा नियोजन समितीकडे मागणी करावी. या समितीने वस्तीशाळा सुरू करण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या तरतुदीच्या अनुषंगाने शिक्षण संचालकांकडे १५ नोव्हेंबरपर्यंत एकत्रित प्रस्ताव पाठवावा.

(५) शिक्षण संचालकांनी सर्व जिल्ह्यातून वस्तीशाळा योजनेअंतर्गत आलेले प्रस्ताव एकत्रित स्वरूपात आर्थिक तरतूद करण्यासाठी ३० डिसेंबरपर्यंत शालेय शिक्षण विभागाकडे पाठवावेत.

**६. वस्तीशाळेची आवश्यकता निश्चित करण्यासाठी जिल्हा परिषदेने विचारात घ्यावयाचे मुद्दे**

(१) शाळेत जाण्यायोग्य वयाची किमान १५ (पंधरा) मुले उपलब्ध आहेत काय ?

(२) ग्रामपंचायतीने वस्तीशाळेसाठी योग्य जागा उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविली आहे काय?

(३) वस्तीशाळा सुरू केल्यामुळे नियमित स्वरूपात सुरू असलेल्या नजीकच्या जिल्हा परिषदेच्या किंवा मान्यताप्राप्त खाजगी शाळेच्या विद्यार्थी पटसंख्येवर परिणाम होईल काय ?

(४) वस्तीशाळेच्या नियोजित ठिकाणापासून अर्धा कि.मी. परिसरात दुसरी प्राथमिक शाळा आहे काय ?

(५) वस्तीशाळा सुरू करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीने आवश्यक ती तरतूद उपलब्ध करून दिलेली आहे काय?

**७. वस्तीशाळेचा कालावधी**

(१) वस्तीशाळा दरवर्षी जुलै ते एप्रिल या कालावधीत किमान २०० दिवसांसाठी चालू राहील.

(२) वस्तीशाळांसाठी ठिकाण व शाळेची वेळ याबाबतचा निर्णय ग्रामपंचायतीच्या स्तरावरच घेण्यात येईल.

**८. वस्तीशाळेसाठी शिक्षकाची अर्हता व नियुक्ती**

(१) वस्तीशाळेसाठी शिक्षण म्हणून स्थानिक डी.एड. पदविकाधारक उमेदवाराची नियुक्ती करावयाची आहे. तथापि, डी.एड. पदविकाधारक उमेदवार उपलब्ध नसल्यास किमान इयत्ता १२वी उत्तीर्ण स्थानिक उमेदवाराची नियुक्ती करावयाची आहे.

(२) शिक्षकाची नियुक्ती ग्रामपंचायतीमार्फत केली जाईल. संबंधित वस्तीवर डी.एड. पदविकाधारक किंवा इयत्ता १२वी उत्तीर्ण उमेदवार उपलब्ध नसल्यास संबंधित गावातील/ग्रामपंचायत क्षेत्रातील/बाजूच्या गावातील उमेदवारांची नियुक्ती करावी.

(३) शिक्षकाची नियुक्ती १० महिन्यांसाठीच राहील व त्याला १० महिन्यांचेच मानधन मिळेल.

(४) वस्तीशाळेतील शिक्षकाची नियुक्ती करार पद्धतीवर राहील. संबंधित ग्रामपंचायतीने / स्थानिक जनतेने शिक्षकाबरोबर करार करावयाचा आहे. करारपत्राचा नमुना सोबत जोडला आहे. (जोडपत्र - 'ब').

**९. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांची जबाबदारी व शिक्षकांचे प्रशिक्षण**

(१) वस्तीशाळा मंजूर झाल्यावर ग्रामपंचायतीने वस्तीशाळेसाठी शिक्षकाची नियुक्ती तत्काळ करावी.

(२) अशा शिक्षकाने वस्तीशाळेत शिकविण्यास सुरुवात करण्यापूर्वी त्याला किमान प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. हे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी संबंधित जिल्ह्यातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेवर राहील. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी वस्तीशाळेतील शिक्षकांसाठी प्रशिक्षणाचा तपशील तयार करावा व त्याआधारे प्रत्यक्ष प्रशिक्षण जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांनी द्यावे.

(३) प्रत्येक वस्तीशाळेमागे शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी एक हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशिक्षणाची रक्कम परस्पर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेला द्यावी.

(४) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांकडे या शाळांसाठी आवश्यक असलेले शैक्षणिक साहित्य विकसित करण्याची व शैक्षणिक मूल्यमापन करण्याची जबाबदारी असेल.

**१०. वस्तीशाळेसाठी अनुदान**

(१) एका वस्तीशाळेसाठी दरवर्षी रु. १३,०००/- अनुदान शासनाकडून दिले जाईल. अनुदानाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| १. | शिक्षकाचे मानधन दरमहा (रु. १,००० x १० महिने) | रु. १०,०००/- |
| २. | शिक्षकाचे प्रशिक्षण | रु. १,०००/- |
| ३. | सादील खर्च | रु. १,०००/- |
| ४. | पाठ्यपुस्तके (२५ विद्यार्थी x रु. ४०/-) | रु. १,०००/- |
| ५. | एकूण वार्षिक खर्च | रु. १३,०००/- |

(२) शिक्षकाचे मानधन व प्रशिक्षणावरील खर्च वगळता अन्य बाबींवर दर्शविलेला खर्च हा मार्गदर्शक स्वरूपाचा आहे. त्यामुळे रुपये १३,०००/- खर्चाच्या मर्यादेपर्यंत वरील बाबी तसेच शाळेला उपयोगी होईल अशा अन्य बाबींसाठी खर्च करता येईल.

(३) वस्तीशाळेसाठीचे अनुदान संबंधित जिल्हा नियोजन समितीने उपलब्ध करून दिलेल्या तरतुदीच्या अधीन राहून शासनाकडून जिल्हा परिषदांमार्फत ग्रामपंचायतींना दिले जाईल.

**११. शिक्षकाचे मानधन**

(१) शिक्षकाला दरमहा रु. १,०००/- (रुपये एक हजार) मानधन देण्यात यावे.

(२) मानधन १० महिन्यांसाठी देण्यात यावे.

(३) ग्रामपंचायतीकडून दरमहा धनादेशाद्वारे मानधन अदा करण्यात यावे.

**१२. वस्तीशाळांची तपासणी**

वस्तीशाळांची तपासणी शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी करावी. प्रत्येक वस्तीशाळेला शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी दर महिन्यातून किमान एकदा भेट द्यावी. वस्तीशाळा केंद्रीय प्राथमिक शाळेच्या परिसरात असतील तर अशा वस्तीशाळा निश्चित करून त्यांच्या मार्गदर्शनाची जबाबदारी शिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित केंद्र प्रमुखांवर सोपवावी.

**१३. वस्तीशाळातील अभ्यासक्रम**

वस्तीशाळातील अभ्यासक्रम, सातत्यपूर्ण मूल्यमापन इत्यादी बाबी नियमित शाळेप्रमाणेच राहतील.

| | |
|---|---|
| १४. **वस्तीशाळांचा दस्तऐवज** | वस्तीशाळांमध्ये किमान आवश्यक दस्तऐवज राहील. दस्तऐवजाचा तपशील शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निश्चित करावा. वस्तीशाळा काही कारणामुळे बंद झाल्यास त्या शाळेतील दस्तऐवज शिक्षण विस्तार अधिकारी निश्चित करतील अशा नजीकच्या नियमित प्राथमिक शाळेत जपून ठेवावा. |
| १५. **वस्तीशाळांचे संनियंत्रण व आढावा** | वस्तीशाळेचे संनियंत्रण व आढावा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ते प्रामुख्याने ग्रामपंचायत / स्थानिक जनतेने करावयाचे आहे. ग्रामपंचायतीच्या सरपंचाने महिन्यातून किमान दोन वेळा वस्तीशाळेला भेट देऊन सर्वसाधारण आढावा घ्यावा. शिक्षण संचालकांनी वस्तीशाळेसाठी मासिक अहवालाचा नमुना विहित करावा व वस्तीशाळेच्या शिक्षकाने या नमुन्यानुसार दरमहा मासिक अहवाल तयार करून तो ग्रामपंचायतीला सादर करावा, त्यावर ग्रामपंचायतीचे अभिप्राय घ्यावेत व त्यानंतर तो अहवाल गट शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवावा. शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी प्रत्येक महिन्यात किमान एकदा भेट देऊन शाळेचे कामकाज योग्यरीतीने चालू आहे किंवा नाही हे पाहावे. तसेच वस्तीशाळेच्या शिक्षकांना मार्गदर्शनही करावे. त्यांनी ग्रामपंचायतीच्या सदस्यांची भेट घेऊन शाळेच्या कामकाजाची माहिती घ्यावी व ग्रामपंचायतीच्या सरपंच / सदस्य / स्थानिक जनता यांच्याबरोबर चर्चा करून आवश्यकतेनुसार वस्तीशाळेचा दर्जा सुधारण्यासाठी उपाययोजना सुचवावी. |

**शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : पीआरई १०९९/(२१७५)/प्राशि-१**
**दिनांक १८ एप्रिल २००० चे सहपत्र**
**जोडपत्र 'ब'**

## वस्तीशाळेवर नियुक्त करावयाचे शिक्षक व ग्राम पंचायत/ स्थानिक जनता यांच्यातील कराराचा नमुना

मी, श्री. / श्रीमती ______________________________ वस्तीशाळा शिक्षक/शिक्षिका, ग्रामपंचायत, गाव तालुका जिल्हा माझ्या वस्तीशाळे-संदर्भातील खाली नमूद केलेल्या जबाबदाऱ्यांसह ग्रामपंचायतीबरोबर / स्थानिक जनतेबरोबर करार करीत आहे.

**आणि**

मी, श्री. श्रीमती ______________________________ सरपंच/सदस्य/स्थानिक जनतेचा प्रतिनिधी गाव तालुका जिल्हा ग्रामपंचायतीच्या / स्थानिक जनतेच्यावतीने

**वस्तीशाळेसंदर्भातील खाली नमूद केलेल्या जबाबदाऱ्यांसह करार करीत आहे :-**

(१) शैक्षणिक वर्षात वस्तीशाळेचे कामकाज जुलै ते एप्रिल या कालावधीत किमान २०० दिवस चालेल. प्रत्येक दिवशी कामकाज किमान पाच तास चालेल. ग्रामपंचायत/स्थानिक जनता वस्तीशाळेसाठी आवश्यक असलेली व्यवस्थापकीय व शैक्षणिक बाबींची पूर्तता करील याची आम्ही हमी देत आहोत.

(२) वस्तीतील शाळेत जाण्यायोग्य वयाच्या सर्व मुलांना शाळेत दाखल करण्याची आम्ही हमी देत आहोत. वस्तीशाळेचे शिक्षक शाळास्तरावर ठेवावयाचे विहित केलेले सर्व अभिलेख ठेवतील. तसेच शिक्षक वस्तीशाळेतील सर्व मुले किमान अध्ययन क्षमता प्राप्त करतील याची हमी देत आहेत.

(३) वस्तीशाळेच्या शिक्षकांना पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मानधन अदा केले जाईल. शाळेला आवश्यक असलेले साहित्य वेळेवर उपलब्ध करून दिले जाईल. वस्तीशाळेसाठी आवश्यक असलेली इमारत ग्रामपंचायत/स्थानिक जनता उपलब्ध करून देण्यासाठी/ बांधण्यासाठी सहभाग देतील. वस्तीशाळेचे शिक्षक वस्तीशाळेचा मासिक अहवाल तयार करतील व तो ग्रामपंचायतीला सादर करतील. वस्तीशाळेचे शिक्षक शाळेत नियमित व वेळेवर उपस्थित राहतील आणि विद्यार्थ्यांना शाळेत नियमित व वेळेवर उपस्थित राहण्यासाठी प्रेरणा देतील. शिक्षक शाळेतील सर्व साधन साहित्याचा योग्यरीतीने वापर करतील आणि शाळा आकर्षक व स्वच्छ ठेवण्याची व्यवस्था करतील.

(४) ग्रामपंचायत / स्थानिक जनता वेळोवेळी बैठक घेऊन वस्तीशाळेच्या प्रशासकीय व शैक्षणिक बाबींच्या विकासासाठी प्रयत्नशील राहील.

(५) वस्तीशाळेसंदर्भात निर्माण झालेले प्रश्न आम्ही संयुक्तरीत्या दूर करू.

वरील करारपत्र आम्हाला बंधनकारक असून त्याचा आम्ही कोणत्याही परिस्थितीत भंग करणार नाही.

**शिक्षकाची स्वाक्षरी**

**ग्रामपंचायतीचे सरपंच/सदस्य/स्थानिक जनतेचे प्रतिनिधी यांची स्वाक्षरी**

**शिक्षकाचे नाव**

**स्वाक्षरी करणाऱ्या पदाधिकाऱ्याचे नाव**

**राज्यात प्राथमिक शिक्षणासाठी**
**'वस्तीशाळा' योजना सुरू करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण विभाग**
**शासन निर्णय, क्रमांकः पीआरई १०९९/(२१७५)/प्राशि-१**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : २० मार्च २००१**

## पार्श्वभूमी :

राज्यामध्ये प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपविण्यात आलेली आहे. काही ठिकाणी खाजगी संस्थांनाही प्राथमिक शाळा सुरू करण्यासाठी मान्यता देण्यात येते. प्राथमिक शाळा सुरू करण्यासाठी शासनाने विहित केलेल्या निकषानुसार सर्वसाधारपणे दीड कि.मी. परिसर व २०० लोकसंख्येसाठी प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध नसल्यास अशा ठिकाणी प्राथमिक शाळा सुरू करण्यात येते. आदिवासी, दुर्गम व डोंगराळ भागात १ कि.मी. परिसर व १०० लोकसंख्येसाठी प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. वरील निकषानुसार शाळा सुरू करण्यात येत असल्या तरी हे निकष पूर्ण न करणाऱ्या अनेक वस्त्या, पाडे, तांडे आहेत जेथे प्राथमिक शाळेची आवश्यकता भासते. विशेषतः नद्या, नाले, डोंगराळ भाग, दुर्गमता इत्यादी नैसर्गिक अडचणींमुळे लहान विद्यार्थ्यांना जवळच्या अन्य गावातील किंवा वस्तीवरील प्राथमिक शाळेत जाणे अडचणीचे होते. अशा ठिकाणी प्राथमिक शिक्षणाची सुविधा कोणत्या न कोणत्या स्वरूपात उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते. शासनाने प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे व ते पूर्ण करण्यासाठी शाळेत जाण्यायोग्य वयाच्या सर्व मुलांना शाळेत दाखल करणे आवश्यक आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देणे ही शासनाची जबाबदारी आहे. या सर्व बाबींचा विचार करता प्राथमिक शाळांची पर्यायी सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक झालेले आहे. मध्यप्रदेश शासनाने शिक्षण हमी योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीकडून शाळा सुरू करण्याची मागणी आल्यास ९० दिवसांत शाळा सुरू करण्याची हमी दिलेली आहे. या शाळा पूर्णपणे ग्रामपंचायतीमार्फत चालविल्या जातात. याच धर्तीवर आपल्या राज्यात पर्यायी योजना सुरू करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय

या शासन निर्णयाद्वारे समक्रमांक दि. १८ एप्रिल २००० चा शासन निर्णय अधिक्रमित करून पुढील आदेश निर्गमित करण्यात येत आहेत. प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विहित केलेल्या निकषांची पूर्तता न करणाऱ्या परंतु प्राथमिक शाळेची आवश्यकता असलेल्या राज्यातील वस्त्या, वाड्या, पाडे, तांडे अशा ठिकाणी प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने वस्तीशाळा सुरू करण्याच्या योजनेस शासनाची मंजुरी देण्यात येत आहे.

२. वस्तीशाळा योजनेचा तपशील सोबतच्या जोडपत्र - अ मध्ये दर्शविला आहे.

३. राज्यामध्ये कार्यान्वित असलेल्या 'जिल्हा प्राथमिक शिक्षण प्रकल्प' (डी.पी.ई.पी.), 'प्राथमिक शिक्षण समृद्धी कार्यक्रम' (पीप) व 'आमची शाळा' या प्रकल्पांतर्गत संबंधित जिल्ह्यामधून संबंधित प्रकल्पासाठी मंजूर असलेल्या निधीतून वस्तीशाळा सुरू करण्यात याव्यात.

४. प्रत्येक आर्थिक वर्षात वस्तीशाळा सुरू करण्यासाठी आवश्यक तरतुदींचे प्रस्ताव संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांनी शिक्षण संचालकांमार्फत शासनाकडे सादर करावेत. वस्तीशाळांसाठी शासनाने आवश्यक ती आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिल्यांनतर वस्तीशाळा सुरू करण्यात येतील. प्रकल्प जिल्ह्यांसाठी निधी प्रकल्पामधून मंजूर करून घेण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६७७१/व्यय ५-अ, दिनांक ७ जानेवारी २००० अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सही/-**
**(जयराज फाटक)**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

गावडे
राज्य प्रकल्प समन्वयक
प्रभारी संचालक प्रकल्प

**प्रति,**

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक , महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
संचालक, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, पुणे
शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य , पुणे
प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, चर्नी रोड, मुंबई
संचालक, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद
संचालक, शासकीय परीक्षा मंडळ, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद
सर्व जिल्हाधिकारी
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळे
मुख्य अधिकारी, विदर्भ व मराठवाड्यातील सर्व नगरपालिका, नगरपरिषदा
सर्व शिक्षणाधिकारी, महानगरपालिका
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -२, नागपूर
महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई
महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा कोषाधिकारी
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, समाजकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, कार्यासन, प्राशि-१.

शाखा
उपसंचालक (प्रकल्प)
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद
जवाहर बालभवन
चर्नी रोड, मुंबई

शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : पीआरई १०९९/(२१७५)/प्राशि-६

दिनांक : २० मार्च २००१

सहपत्र

जोडपत्र - 'अ'

| | | |
|---|---|---|
| १. | **वस्तीशाळेचे स्वरूप** | (१) वस्तीशाळेचे स्वरूप अनौपचारिक असेल. वस्तीशाळा ही बहुवर्ग प्राथमिक शाळा असेल.<br>(२) ग्रामशिक्षण समितीस वस्तीशाळेची मागणी करता येईल.<br>(३) वस्तीशाळेत इयत्ता १ली ते ४थी पर्यंतचा राज्य शासनाचा नियमित अभ्यासक्रम शिकविला जाईल.<br>(४) प्रत्येक विद्यार्थ्यास स्वतःच्या गतीने अभ्यासक्रम पूर्ण करता येईल.<br>(५) वस्तीशाळा नियमित प्राथमिक शाळेप्रमाणे पूर्णवेळ चालू राहील. |
| २. | **वस्तीशाळा सुरू करण्यासाठी निकष** | (१) एक कि.मी. परिसरात प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध नसलेल्या ठिकाणी वस्तीशाळा सुरू करता येईल. मात्र आवश्यकतेनुसार ही अट शिथिल करता येईल.<br>(२) प्रत्येक वस्तीशाळेत इयत्ता १ली ते ४थी चे एकत्रित सुमारे १५ (पंधरा ) पर्यंत विद्यार्थी असणे आवश्यक आहे.<br>(३) वस्तीशाळा सुरू करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत / ग्रामशिक्षण समिती/ग्रामस्थ यांनी विनामूल्य जागा उपलब्ध करून देणे अनिवार्य राहील. |
| ३. | **सर्वेक्षण आणि आर्थिक तरतुदी** | (१) जिल्हा स्तरावर सर्वेक्षणातून प्राप्त झालेल्या ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य मुलांच्या माहितीच्या आधारे आवश्यक तरतुदीची मागणी करावी.<br>(२) शिक्षण संचालकांनी सर्व जिल्ह्यातून वस्तीशाळा योजनेअंतर्गत आलेले प्रस्ताव एकत्रित स्वरूपात आर्थिक तरतूद करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाकडे पाठवावेत. |
| ४. | **वस्तीशाळेची मागणी** | (१) संबंधित शहराच्या / गावाच्या नगरपालिका/नगर परिषदा/महानगरपालिका / ग्रामपंचायत / ग्रामशिक्षण समितीस वस्तीशाळेची मागणी वर्षात कधीही शिक्षण अधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद यांचेकडे करता येईल.<br>(२) वस्तीशाळेची मागणी शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचेकडे गटशिक्षणाधिकारी यांचेमार्फत सोबत दिलेल्या प्रपत्रात (जोडपत्र-ब) करता येईल. |

| | |
|---|---|
| ५. **वस्तीशाळेचे व्यवस्थापन व प्रशासन** | (१) वस्तीशाळा चालविण्याची संपूर्ण जबाबदारी ग्रामपंचायत / ग्रामशिक्षण समिती यांची राहणार असून वस्तीशाळेचे व्यवस्थापन आणि प्रशासन त्यांनी सांभाळावयाचे आहे. वस्तीशाळेसाठी विहित केलेल्या अर्हतेच्या स्वयंसेवी शिक्षकांची नियुक्तीही संबंधित व्यवस्थापनामार्फत केली जाईल.<br>(२) ग्रामशिक्षण समितीचे अध्यक्ष व समितीचे सचिव (मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा) यांचे नावे संयुक्त बँक खाते उघडण्यात येईल. |
| ६. **वस्तीशाळा सुरू करण्याची कार्यपद्धती** | (१) वस्तीशाळेची मागणी प्राप्त झाल्यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी मागणी केलेल्या ठिकाणी वस्तीशाळेच्या आवश्यकतेची तपासणी करवून घेतील व प्रस्ताव शिक्षण समितीपुढे सादर करतील.<br>(२) वस्तीशाळेच्या मागणीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून एक महिन्यात जिल्हा परिषद , शिक्षण समिती, शिक्षण संचालक (प्राथ.) यांना शिफारस करतील.<br>(३) जिल्ह्याकडून वस्तीशाळेची शिफारस प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांचे आत शिक्षण संचालक (प्राथ.) वस्तीशाळेच्या मान्यतेबाबत निर्णय संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि.प. यांना कळविणे. |
| ७. **वस्तीशाळेची आवश्यकता निश्चित करण्यासाठी शिक्षण समितीने विचारात घ्यावयाचे मुद्दे** | (१) प्रस्तावित वस्तीवर इ. १ली ते ४थी ची एकत्रित सुमारे १५ (पंधरा) मुलामुलींची यादी.<br>(२) वस्तीशाळेसाठी योग्य जागा विनामूल्य उपलब्ध करून देण्याबाबत ग्रामपंचायतीचे हमीपत्र.<br>(३) वस्तीशाळेच्या नियोजित ठिकाणापासून सर्वांत जवळील नियमित शाळेचे अंतर.<br>(४) ग्रामशिक्षण समितीचा वस्तीशाळेबाबत मागणी ठराव. |
| ८. **वस्तीशाळेचा कालावधी** | (१) वस्तीशाळा दरवर्षी सोयीच्या कालावधीत किमान २०० दिवसांसाठी चालू राहील.<br>(२) वस्तीशाळा नियमित शाळेप्रमाणेच दररोज पूर्णवेळ चालू राहील. वस्तीशाळेची वेळ संबंधित व्यवस्थापन निश्चित केल्याप्रमाणे राहील. |
| ९. **वस्तीशाळेसाठी स्वयंसेवी शिक्षकाची अर्हता व नियुक्ती** | (१) स्वयंसेवी शिक्षकांची नियुक्ती स्थानिक उमेदवारामधून करण्यात येईल व महिला उमेदवारांना प्राधान्य राहील.<br>(२) स्वयंसेवी शिक्षकाची अर्हता अध्यापन पदविका (डी.एड.) राहील. |

(३) स्थानिक डी.एड. उमेदवार उपलब्ध नसल्यास किमान इयत्ता १२ वी उत्तीर्ण स्थानिक उमेदवाराची नियुक्ती करता येईल.

(४) स्थानिकरीत्या वरील दोन्ही अर्हतेचे उमेदवार उपलब्ध नसल्यास लगतच्या गावातील / वस्तीतील डी.एड. उमेदवाराची नियुक्ती करता येईल.

(५) स्थानिक डी.एड. अथवा स्थानिक १२वी उत्तीर्ण अथवा लगतच्या वस्ती/गावातील डी.एड. उमेदवारही उपलब्ध नसल्यास लगतच्या वस्ती/गावातील इ. १२वी उत्तीर्ण उमेदवाराची नियुक्ती करता येईल.

(६) स्वयंसेवी शिक्षकाची नियुक्ती १० महिन्यांसाठीच करार पद्धतीने मानधनावर संबंधित व्यवस्थापनामार्फत केली जाईल.

(७) या संदर्भात स्वयंसेवी शिक्षकांबरोबर करावयाच्या करारपत्रात नमुना नियुक्ती आदेश व कराराच्या अटी व शर्ती सोबत जोडला आहे. (जोडपत्र -क)

**१०. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांची जबाबदारी आणि स्वयंसेवी शिक्षकांचे प्रशिक्षण**

(१) वस्तीशाळा मंजूर झाल्यावर संबंधित व्यवस्थापनाने वस्तीशाळेसाठी स्वयंसेवी शिक्षकाची नियुक्ती तत्काळ करावी.

(२) स्वयंसेवी शिक्षकाने वस्तीशाळेत अध्यापनास सुरुवात करण्यापूर्वी त्याला किमान ३० दिवस प्रशिक्षण देण्यात येईल. हे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शनाखाली संबंधित जिल्ह्यातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेची राहील. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने वस्तीशाळेतील शिक्षकांसाठी प्रशिक्षणाचा तपशील तयार करावा व त्याआधारे प्रत्यक्ष प्रशिक्षण जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमार्फत आयोजित करावे.

(३) या संदर्भातील आर्थिक प्रस्ताव परिषदेने शासनास सादर करावा.

(४) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांकडे या शाळांसाठी आवश्यक असलेले शैक्षणिक साहित्य विकसित करण्याची व स्वयंसेवी शिक्षकांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी राहील.

११. **वस्तीशाळेसाठी अनुदान**

(१) एक वस्तीशाळेसाठी दरवर्षी रु. १३,०००/- मर्यादेपर्यंत अनुदान शासनाकडून दिले जाईल. अनुदानाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | शिक्षणाचे मानधन दरमहा (रु. १,०००/- x १० महिने ) | रु. १०,०००/- |
| २. | शिक्षकाचे प्रशिक्षण | रु. १,०००/- |
| ३. | सादील खर्च | रु. १,०००/- |
| ४. | पाठ्यपुस्तके (रु. ४०/- प्रति विद्यार्थी) | रु. १,०००/- |
| ५. | एकूण वार्षिक खर्च | रु. १३,०००/- |

(२) प्रशिक्षणावरील खर्च वगळता अन्य सर्व बाबींवर दर्शविलेला खर्च संबंधित स्थानिक व्यवस्थापनाकडे सुपूर्त करण्यात येईल.

(३) वस्तीशाळेसाठीचे शासन अनुदान शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण यांचेमार्फत संबंधित जिल्हा परिषदांना वर्ग करण्यात येईल.

१२. **स्वयंसेवी शिक्षकाचे मानधन**

स्वयंसेवी शिक्षकाला दरमहा रु. १,०००/- (रुपये एक हजार) मानधन पुढील महिन्याच्या ७ तारखेपर्यंत धनादेशाद्वारे संबंधित व्यवस्थापनामार्फत अदा करण्यात येईल.

१३. **वस्तीशाळांतील अभ्यासक्रम**

वस्तीशाळेचा अभ्यासक्रम आणि सातत्यपूर्ण मूल्यमापन इत्यादी बाबी नियमित शाळेप्रमाणेच राहतील.

१४. **वस्तीशाळांचा दस्तऐवज**

वस्तीशाळेमध्ये नियमित शाळेप्रमाणेच दस्तऐवज राहतील. वस्तीशाळा काही कारणामुळे बंद झाल्यास त्या शाळेतील दस्तऐवज नियंत्रक प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकाने जपून ठेवावा.

१५. **वस्तीशाळांची तपासणी संनियंत्रण व आढावा**

(१) वस्तीशाळेवर निकटतम प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकाचे दैनंदिन पर्यवेक्षण व नियंत्रण राहील.

(२) वस्तीशाळांची तपासणी केंद्रप्रमुख करतील व प्रत्येक वस्तीशाळेला दर महिन्यातून किमान एकदा भेट देतील.

(३) वस्तीशाळेच्या स्वयंसेवी शिक्षकांचे प्रत्येक महिन्यातून किमान २ दिवस केंद्र पातळीवर उद्‌बोधन घेण्याची जबाबदारी केंद्रप्रमुखांवर राहील.

(४) गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी दर ३ महिन्यांनी वस्तीशाळेस भेट देतील.

वस्तीशाळेचे संनियंत्रण व आढावा अत्यंत महत्त्वपूर्ण असून तत्संबंधीची प्राथमिक जबाबदारी ग्रामशिक्षण समितीचे अध्यक्ष यांनी वस्तीशाळेस वारंवार भेट देऊन आढावा घ्यावा.

शिक्षण संचालकांनी वस्तीशाळेसाठी मासिक अहवालाचा नमुना विहित करावा व वस्तीशाळेच्या स्वयंसेवी शिक्षकाने या नमुन्यानुसार दरमहा मासिक अहवाल तयार करून तो संबंधित व्यवस्थापनास सादर करावा व त्यावर संबंधित व्यवस्थापनाचे अभिप्राय घ्यावेत व त्यांनतर तो अहवाल ग्रामीण विभागाकरिता गट शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवावा. ग्रामशिक्षण समिती शिक्षण समितीचे अध्यक्ष यांनी ग्रामशिक्षण समितीची भेट घेऊन शाळेच्या कामकाजाची माहिति घ्यावी व स्थानिक जनतेबरोबर चर्चा करून आवश्यकतेनुसार वस्तीशाळेचा दर्जा सुधारण्यासाठी उपाययोजना सुचवावी. भेट देणाऱ्या अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी आपल्या सूचना लेखी द्याव्यात. केंद्रप्रमुखांनी या सूचनांचा मागोवा घेऊन त्यावर सुयोग्य कार्यवाही करवून घ्यावी.

# वस्तीशाळेसाठी अर्जाचा नमुना

## जोडपत्र 'ब'

१. ग्रामपंचायत/ग्रामशिक्षण समितीचे नाव :

पूर्ण पत्ता :

२. ग्रामपंचायत/ग्राम शिक्षण समितीच्या - प्राधिकृत संपर्काधिका-याचे नाव :

३. वस्तीशाळेचे ठिकाण (नकाशासह):

वस्तीशाळेतील : ठराव क्र. (प्रत सोबत)

विद्यार्थी संख्या दिनांक

४. वस्तीशाळेच्या प्रस्तावित जागेचा ठिकाण दर्शक परिसर नकाशात जोडला आहे काय ? होय/नाही

जागा मोफत उपलब्ध करीत असल्याबाबतचे मालकाचे प्रमाणपत्र जोडले काय ? होय/नाही

५. वस्तीशाळा आवश्यक असल्याबाबतचा सहाव्या सर्वेक्षणाआधारे गटशिक्षणाधिकाऱ्यांचा दाखला जोडला आहे/नाही.

६. ग्रामशिक्षण समितीने स्वतंत्र बँक खाते उघडले काय ? होय/नाही.

७. बँकेचे नाव, शाखा व खाते क्र :

आहरण अधिका-यांची पदे व नावे : (१) (२)

अ. प्रमाणपत्र देण्यात येते की प्रस्तावित वस्तीशाळा ही आमच्या ग्रामपंचायत/ग्रामशिक्षण समितीच्या ठरावान्वये प्रस्तावित केली आहे. या प्रस्तावित ठिकाणापासून १ कि.मी.परिसरात प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध नाही.

ब. हमी देतो की आम्ही या कामी विद्यार्थ्यांना कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

क. वस्तीशाळा मान्यता पुढे सुरू ठेवण्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील याची आम्हांला जाणीव आहे.

ड. या शाळेतील स्वयंसेवी शिक्षक पूर्णतः आमचा कंत्राटी सेवक राहील व त्याच्या सेवा करारातील कलमानुसार कंत्राट कालावधीसाठी राहतील.

दिनांक :

| | | |
|---|---|---|
| **सदस्य-सचिव**<br>**ग्रामशिक्षण समिती** | **अध्यक्ष**<br>**ग्रामशिक्षण समिती** | **सरपंच**<br>**ग्रामपंचायत** |

# वस्तीशाळा योजना

## स्वयंसेवी शिक्षक

जोडपत्र 'क'

# करारपत्र

हा करार आज ग्रामपंचायत/ग्रामशिक्षण समिती ही वस्तीशाळा चालविण्यासाठी शासनाने संबंधित संस्था जाहीर केल्यानुसार या करारासाठी पक्ष क्रमांक १ आहे. त्या संस्थेचे अध्यक्ष/सरपंच ------------------------- ग्रामपंचायत/ग्रामशिक्षण समिती तालुका---------------------- जिल्हा ------------------------------

**आणि**

श्री./श्रीमती/कु. वय : वर्षे

पत्ता :

जी करारासाठी पक्ष क्रमांक २ आहे यांच्या दरम्यान आज दिनांक ----------------------------------- रोजी करण्यात येत आहे.

**सदर कराराचे नियमन करणाऱ्या अटी/शर्ती खालीलप्रमाणे असतील ...**

१. श्री./श्रीम./कु. पक्ष क्र.२ यांची `स्वयंसेवी शिक्षक` म्हणून वस्तीशाळेसाठी निवड झालेली आहे.

२. `स्वयंसेवी शिक्षक` म्हणून विहित कामे करणे हे पक्ष क्र.२ वर बंधनकारक राहील.

३. सदर कामासाठी पक्ष क्र.१ हे पक्ष क्र.२ यांना प्रतिमाह रु. १,०००/- (रुपये एक हजार) इतके मानधन अदा करतील व सदर कराराचा कालावधी आपोआप ३० एप्रिल ------------- रोजी संपुष्टात येईल.

४. सदर करार हा दोन्हींपैकी कोणत्याही पक्षाला एक आठवड्याच्या पूर्व सूचनेने समाप्त करता येईल.

५. पक्ष क्र.२ हे पक्ष क्र.१ यांचे नियंत्रणाखाली स्वतःचे जबाबदारीवर काम करतील व कराराचे कालावधीत कोणत्याही तऱ्हेच्या अनेपक्षित कारणामुळे अथवा झालेल्या अपघातामुळे त्यास कोणत्याही प्रकारची शारीरिक व मानसिक इजा झाल्यास त्यासाठी पक्ष क्र.१ कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

६. पक्ष क्र. २ यास कराराच्या कालावधीत अन्य ठिकाणी कोणतेही काम स्वीकारण्यास मनाई असेल.

७. पक्ष क्र. २ हे पक्ष क्र. १ च्या अधिपत्याखाली सदर वस्तीशाळेच्या १ कि.मी. परिसरातील ६ ते १४ वयोगटाच्या सर्व मुलांना इ. १ली ते ४थीच्या निर्धारित अभ्यासक्रमाचे अध्यापन करण्याची जबाबदारी निकटतम मुख्याध्यापकांच्या नियंत्रणाखाली व मार्गदर्शनाखाली पूर्ण करतील.

८. पक्ष क्र. २ हे पक्ष क्र. १ च्या आदेशानुसार आणि नियंत्रक - मार्गदर्शक मुख्याध्यापकांच्या निदेशानुसार विहित सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण करतील.

९. पक्ष क्र. २ हे वस्तीशाळेत ६-१४ वयाची सर्व शाळाबाह्य मुले, मुली दाखल करणे, त्यांच्या १००% हजेरीची खातरजमा करणे, विहित केलेल्या दिवसांसाठी वस्तीशाळेचे कामकाज नियमित शाळेनुसार चालविणे, त्यांच्या विहित अध्ययन क्षमता व संपादणुकीसाठी शैक्षणिक कार्य करणे, अध्ययन साहित्य निर्माण करणे, अध्यापन व मूल्यमापन करणे, सर्व आवश्यक अभिलेख ठेवणे व मासिक अहवाल सादर करणे ही कर्तव्ये पार पाडतील.

१०. पक्ष क्र.१ यांना पूर्ण जाणीव आहे की, त्यांचेशी केलेला हा करार पूर्णतः पक्ष क्र. २ शी बांधील असून त्यांचे कोणतेही उत्तरदायित्व जिल्हा परिषद, महाराष्ट्र शासन अथवा महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांकडे असणार नाही. त्यांना या कराराच्या आधारे कोणतेही सेवा सातत्य वा अन्य लाभ मिळणार नाहीत या अटी पक्ष क्र. १ यांना मान्य राहतील.

११. वरील १ ते १० पैकी कोणत्याही कलमाचा पक्ष क्र. २ कडून भंग झाल्यास हा करार रद्द करण्याचे अधिकार पक्ष क्र. १ कडे असतील.

**नाव :** **स्वाक्षरी**
**पक्ष क्र. २**

**दिनांक :**

**प्राधिकृत अधिकारी**
**(ग्रामपंचायत/ ग्रामशिक्षण समिती )**

**स्वाक्षरी**
**पक्ष क्र. १**

**दिनांक :**

**साक्षीदार**

१.____________________

२.____________________

# कराराच्या अटी शर्ती

**जोडपत्र ' क '**

१. स्वयंसेवी शिक्षकांच्या करार आदेशासोबत पक्ष क्र. २ ने रु. २०/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे व पक्ष १ व २ यांनी तो मान्य असल्याच्या स्वाक्षऱ्या करणे आवश्यक आहे.

२. सदर करार फक्त १० महिन्यांच्या कालावधीसाठी राहील.

३. करार कालावधी संपल्यानंतर पुढील सेवा सातत्याबद्दल संबंधितांस हक्क राहणार नाही.

४. कंत्राटांची कलमे व सर्व नियम संबंधितांस लागू राहतील.

५. सदर करार कालावधी संपण्यापूर्वीदेखील रद्द करण्याचा अधिकार संबंधित व्यवस्थापनास राहील.

६. करार कालावधी संपण्यापूर्वी जर पक्ष क्र. १ अथवा क्र. २ यांना करार संपुष्टात आणावयाचा असल्यास सात दिवसांची सूचना देणे आवश्यक आहे.

# नियुक्ती आदेश

## जोडपत्र ``क``

ग्रामशिक्षण समिती ____________________

श्री. /श्रीमती ____________________ यां ची ____________ या

वस्तीसाठी सुरू केलेल्या वस्तीशाळेत स्वयंसेवी शिक्षक म्हणून सोबत दिलेल्या करारानुसार व

करारासोबत दिलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून ____________पासून ____________या

कालावधीसाठी नियुक्ती करीत आहे.

**दिनांक :**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**(ग्रामपंचायत / ग्रामशिक्षण समिती/म.न.पा/न.पा.)**